| 3.3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five years (10) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of the author/s | Department of the teacher | Title of the book/chapters published | Title of the paper | Title of the proceedings of the conference | National / International | Year of publication | ISBN/ISSN number of the proceeding | Whether at the time of publication Affiliating InstitutionWas | Name of the publisher |
| **Jan-2025 To Dec - 2025** | | | | | | | | | | |
| 1 | Dr.Keshav S Gore | Marthi | Indian thinkers and Saint literature philosophy and influence | Sant Gyaneshwar ektavache tatvgyan | National | | Aug2025 | ISBN:978-93-95494-62-5 | | Aadhar publication Amravati |
| 2 | Dr.Keshav S Gore | Marthi | Indian thinkers and Saint literature philosophy and influence | Sant Tukaram abhang aani samajik Samta | National | | Aug2025 | ISBN:978-93-95494-62-5 | | Aadhar publication Amravati |

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Dr.Baliram Awchar | Sociology | Exploring growth of India A Multidimensional journey | Gramin Vikassamadhi Gram Panchayat ki bhumika | National | | Aug2025 | ISBN:978-81-980457-9-9 | | Jyotichandra publication Latur |
| 4 | Dr.Kavita Kavre | Social Work | Environment and Humanity:An Interdisciplinary Approach | Paryavaran aani Manav | National | | Aug2025 | ISBN:978-93-95494-83-0 | | Aadhar publication Amravati |
| 5 | Dr.Balvant N Patil | Social Work | Exploring growth of India A Multidimensional journey | Gramin sthanik shasan sanstheche badalte Swaroop mahilaancha samajik darja | National | | Aug2025 | ISBN:978-81-980457-9-9 | | Jyotichandra publication Latur |
| 6 | Dr.Archana Dharne | Social Work | Exploring growth of India A Multidimensional journey | Digital shikshan aani gramin bhagaatil Avni | National | | Aug2025 | ISBN:978-81-980457-9-9 | | Jyotichandra publication Latur |
| 7 | Dr.Premsing P Jadhao | Social Work | Indian Constitution and Human Rights | Bhartiya sanvidhan Ani Manvi hak Chalval | National | | Sept 2025 | ISBN:978-93-6186-955-6 | | Editors Dr.Sandip B Kale Dr.Bhole Vicharmanch Nagpur |

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA

Principal,
Smt. Panchfuladevi Patil College of Social Work, Khadki. Akola (M.S.)

Scanned with OKEN Scanner

Dr. Gawande
Aug 25

# Indian Thinkers and Saint Literature – Philosophy and Influence

भारतीय विचारवंत आणि संत साहित्य – विचारधारा आणि प्रभाव


संपादक

प्रा .डॉ. प्रशांत काटोले

डॉ.विराग गावंडे



आधार पब्लिकेशन, अमरावती.



Smt. P.D. Patil Social Work College ☆ Khadki, AKOLA ☆
College Code 225

Scanned with OKEN Scanner

# Index



| S.No | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Raja Ram Mohan Roy: Social and Religious Philosophy **Dr. Shivaji M. Kanfade** | 1 |
| 2 | Pandit Jawaharlal Nehru on Secularism **Dr. Umesh Vithalrao Kadu** | 10 |
| 3 | Intersecting Paths to Liberation: Learning from Ambedkar's Approaches to Caste, Class, and Gender **Dr. Sunil. A. Dhapse** | 16 |
| 4 | An Overview Of Swami Vivekananda: An Approach Of Philosophy & Reform **Dr. Sangita N. Lohakpure** | 27 |
| 5 | "Swami Vivekananda's Philosophy of Education: Man-Making, Character Building and National Regeneration" **Dr. I. D. Pawade** | 34 |
| 6 | Dr. Babasaheb Ambedkar's Political Thoughts and Actions **Prof.Dr.Rajkumar Pandhari Dasarwad** | 44 |
| 7 | संत तुकारामांचे आर्थिक विचार **प्रा .डॉ. प्रशांत काटोले** | 52 |
| 8 | संत ज्ञानेश्वर : एकत्वाचे तत्त्वज्ञान **प्रा .डॉ केशव सिताराम गोरे** | 57 |
| 9 | संत तुकाराम : अभंग आणि सामाजिक समता **प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे** | 66 |
| 10 | विनोबा भावे यांचे भूदान चळवळीतील योगदान **डॉ. आर. एम. सरपाते** | 76 |



Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA
College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

# संत ज्ञानेश्वर : एकत्वाचे तत्त्वज्ञान

प्रा डॉ केशव सिताराम गोरे
(मराठी विभाग)
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी - अकोला
मो. नं. ९६३७४४२९३७ मेल keshavgore101@gmail.com

महाराष्ट्र संतांची भूमी आहे. इथे महान संत होऊन गेले. संत ज्ञानेश्वरा पासून ते संत गाडगेबाबा पर्यंत अनेक महान विभूती या महाराष्ट्र भूमीत होऊन गेल्यात. ज्यांनी आपल्या घरावर तुळशी पत्र ठेवून समाजाची अहोरात्र सेवा केली. समाजाचं भलं व्हावं, त्यांच्या जीवनातील अंध:कार नाहीसा व्हावा, यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. या संतांनी जाती, धर्म, पंथ, स्त्री - पुरुष असा कुठलाही भेदभाव केला नाही. त्यांनी एकत्वाचे तत्त्वज्ञान आपल्या विचारातून, साहित्यातून, व्याख्यानातून, ग्रंथातून, अभंगातून, हरिपाठातून इतर समाजाला देण्याचा प्रयत्न केला. असे महान संत आपल्या महाराष्ट्राला लाभले, हे आपले अहोभाग्य आहे. संतांनीं कधी स्वत:चा विचार केला नाही. त्यांनी समाजाचा विचार केला.

आम्ही वैकुंठवासी आलो याची कारणाशी । बोलीले जे ऋषी साच भावे वर्ताया ॥

आम्ही जनकल्याणासाठी, जनउद्धारासाठी या भूतलावर अवतार घेतलेला आहे, असे ते म्हणतात. ऋषी मुनीचे विचार या भूतलावर सर्वभूत करण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. या ऋषीमुनीचे वचन समाजाला देण्यासाठी त्यांनी आपले अवतार कार्य या भूतलावर घालविले. आपल्या वाणीतून, विचारातून त्यांनी समाजाला एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. समता, बंधुत्व, स्वातंत्र्य, न्यायाची शिकवण त्यांनी समाजाला दिली.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

समतेच्या भगव्या ध्वजाखाली त्यांनी समाज एकसंघ, एकजीव करण्याचा प्रयत्न केला. समाजाला नवसंजीवनी दिली.

सकळासी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरीच्या नामे ॥

सर्व प्राणीमात्रांना परमेश्वराचे नाव घेण्याचा अधिकार आहे, हे ते ठणकावून सांगत असत. सरळ सोपी भक्ती म्हणजे नाम भक्ती संतांनी समाजाला शिकविली. या भक्तीच्या माध्यमातून परमेश्वराला आपलंसं करून घेण्याचा त्यांनी एक सोपा मार्ग समाजाला दिला.

सर्व संतांनी समाजाला समतेच्या भगव्या ध्वजाखाली एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कुठल्याही प्रकारचा भेद न करता स्त्री-पुरुषांना भक्तीचा अधिकार प्राप्त करून दिला. त्यांचा एक वारकरी संप्रदाय होता. या संप्रदायाच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार केला. पंढरपूरचा पांडुरंग हे त्यांचे आराध्य दैवत आहे. या पांडुरंगाच्या दर्शनासाठी दरवर्षी हजारो भाविक पंढरपूरला येत असतात. एकतेचे, समतेचे, न्यायाचे, बंधुत्वाचे तत्त्वज्ञान लाखोच्या संख्येने सहभागी होऊन घेतात. त्यापैकीच एक महान संत म्हणजे संत ज्ञानेश्वर होत. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि त्या पायावर आज वारकरी संप्रदायाची भली मोठी इमारत उभी आहे.

संत ज्ञानेश्वरांचे अवतारकार्य समाजाचा उद्धार करण्यासाठीच होते, असे आपल्याला वाटते.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती परोपकारे ॥

संतांचे विचार म्हणजे त्यांनी समाजावर केलेला उपकार आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, हरिपाठ, अभंग, विराण्या अशा प्रकारच्या रचना केल्या. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे संस्कृत मध्ये असलेल्या भगवद्गीतेवर मराठी मधून केलेली टीका, भाष्य होय. संस्कृत मध्ये



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

असलेले तत्त्वज्ञान त्यांनी मराठीचे अलंकार घालून सर्वसामान्यजनासाठी मराठीमध्ये आणले.

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मांनंद लहरी प्रगट केली ॥

गीतेला मराठी मध्ये आणून त्यांनी सर्व जनतेला ब्रह्मानंदाची प्राप्ती करून दिली. संत ज्ञानेश्वर हे संत, तत्त्वज्ञ आणि कवी अशा तीन रूपामध्ये वावरत असत. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मधून एकत्वाचे तत्वज्ञान शिकविले -

जे जे दिसे भूत । ते ते मानिजे भगवंत ॥

या भूतलावरील सर्व सजीव अंश म्हणजे परमेश्वराचे रूप आहेत असे त्यांचे सांगणे होते. त्यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ श्रोत्यांशी केलेला संवाद, अमृतानुभव हा मनाशी केलेला संवाद आणि चांगदेव पासष्टी म्हणजे मित्राशी केलेला संवाद होय. हरिपाठ हे काव्य तर सर्वसामान्य जनतेसाठी नवसंजीवनी ठरले. त्यांची अभंग रचना म्हणजे समाजासाठी एक आचारसंहिताच होय.

१. **नित्य नूतन आनंद देणारा अक्षर ग्रंथराज** - संत ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे समाजाला नवीन नवीन आनंद देणारा असा हा ग्रंथ होय. श्रीभगवद्गीतेची थोरवी वर्णन करताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी शंकर-पार्वतीच्या संवाद रूपाने जे सांगितले ते त्यांच्या ज्ञानेश्वरी टीका ग्रंथालाही लागू पडते. महादेव गीतेचे सारखे चिंतन करीत बसलेले पाहून पार्वतीला विस्मय वाटला. म्हणून तिने त्याबद्दल शंकरांना प्रश्न केला त्या प्रश्नाचे उत्तर देताना शंकर म्हणतात -

हरू म्हणे नेणिजे । देवी जैसे का स्वरूप तुझे ॥
तैसे नित्य नूतन देखीजे । गीता तत्व ॥

भगवद्गीता म्हणजे नित्यनूतन आनंद देणारा असा महान ग्रंथ होय आणि हेच वर्णन श्री ज्ञानेश्वरीला लागू पडते.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

२. 'बुडती हे जन न पहावे डोळा' ही ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची प्रेरणा - ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे उच्च ध्येयाच्या पूर्ततेसाठी लिहिला गेला आहे.

अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोका ॥

ज्ञानेश्वरी लेखनामुळे सर्वसामान्य जणांचा संसार सुखाचा झाला आणि त्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला. ज्यांना संस्कृत भाषा येत नाही, त्यांनाही ब्रह्मविद्या प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी प्राकृतात रचना केली. या माध्यमातून त्यांनी धर्माचे तत्त्वज्ञान समाजाला उपलब्ध करून दिले. गीतेतील विचार मराठीत आणून उत्तमापासून अंत्यजापर्यंत सर्वांना भक्तीची वाट खुली करून दिली व एकत्वाचे तत्वज्ञान सांगितले. 'बुडती हे जन न पहावे डोळा' या जनहिताच्या दृष्टीने ज्ञानेश्वरांची ग्रंथरचना झाली आहे.

इये मराठीचे नगरी। ब्रह्मविद्याचा सुकाळू करी ॥

या दृष्टीने त्यांनी निर्धार करून अध्यात्म विद्येचे ज्ञान सर्वसामान्य समाजातील खालच्या स्तरापर्यंत पोहोचविले. माझा मराठाची बोलू कौतुके।

परी अमृतातेही पैजा जिंके ॥

ही दृढ प्रतिज्ञा त्यांनी केली होती.

३. **सामाजिक जाणीवेचे अधिष्ठान प्राप्त करून देणारे तत्वज्ञान** - ज्ञानेश्वरांना वेदाचे सामर्थ्य मान्य होते, परंतु वेदाने दाखविलेली कृपणता त्यांना मान्य नव्हती. ज्ञानेश्वरांनी शास्त्र प्रामाण्य याची रूढ चौकट काहीशी सर्वसमावेशक केली. समाजनिष्ठ असलेल्या ज्ञानेश्वरांच्या दृष्टीला स्त्री शूद्रांची होणारी विटंबना खूपणारी होती. समाजामध्ये विषमतेचा दृष्टिकोन रूढ झाला होता. भक्ती आणि अध्यात्म ही क्षेत्रे देखील विषमतेने ग्रासलेली होती. संस्कृत भाषेतील बंदिस्त तत्त्वज्ञानापासून, अध्यात्मज्ञानापासून जनता वंचित झाली होती.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद वर्म अमंगल ॥



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

कुणाही भुताचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥

अशी त्यांनी समतेची व ममतेची शिकवण दिली.

म्हणूनि कुळ जाती आणि वर्ण । हे अवघेचि गा अकारण ॥

त्यांना जाती-जातीमध्ये पंथा-पंथामध्ये भेद मान्य नव्हता. संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा समाजावर दूरगामी परिणाम झाला. त्यांनी सामाजिक समतेची विण जुंपली. संत ज्ञानेश्वर आणि संत चोखामेळा उराउरी भेटले. त्यांनी एककंठाने विठ्ठल भक्तीचे गीत गाईले. अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र घेऊन त्यांनी चंद्रभागेच्या वाळवंटात समतेचे एकतेचे दर्शन घडविले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी समता, बंधुता निर्माण करण्याचे कार्य केले. धर्माच्या आणि जातीच्या क्षेत्रात स्त्रीशूद्रांसाठी असलेली कुंपणे त्यांनी तोडून टाकली. म्हणूनच वेद प्रामाण्याला बाजूला सारून त्यांनी गीतेची उदार भूमिका प्रस्तुत केली. धर्म आणि देव यावरील विशिष्ट जातीच्या लोकांचा अधिकार त्यांनी हुडकावून लावला. धर्माचा प्रदेश मुक्त आहे. तिथे जात, संप्रदाय, कुळ आणि वंश यांच्या तटबंदी निरर्थक असल्याचा सिद्धांत ज्ञानेश्वरांनी मांडला. अशाप्रकारे संत ज्ञानेश्वरांनी कुळ, जाती, वर्णाचा अहंकार हद्दपार केला.

**४. संत ज्ञानेश्वरांचे स्वातंत्र्य, समता व बंधुभावाचे तत्वज्ञान** - ज्या सामाजिक स्तरात स्वातंत्र्य, समता व बंधुभावाचा उजेड पोहोचला नव्हता, तिथे वारकरी संप्रदायातील उदारमतवादी व प्रगमनशील विचारांच्या संत ज्ञानेश्वरांनी तो पोहोचविला. त्यांच्या जोडीला नंतर विविध जातीचे संत जोडल्या गेले. त्यामध्ये संत चोखामेळा, कर्ममेळा, सोयराबाई, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सेनान्हावी, संत नरहरी सोनार इत्यादी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतील भक्त आत्मप्रत्ययाने भजन कीर्तन करू लागले व उपदेश करू लागले. ईश्वराच्या हिशोबी आपण समान आहोत या



L.P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

जाणिविने त्यांना नवीन बळ मिळाले. समाजाच्या विविध स्तरातून भक्ती ज्ञानाचे झरे खळखळून वाहायला लागले. माणसाच्या माणूसपणाला प्रतिष्ठा प्राप्त झाली व सामाजिक उन्नतीचे एक पाऊल पुढे पडले.

संत ज्ञानेश्वरांनी समतेचा ध्वज उभा केल्यामुळे सामान्य माणूस प्रामाणिक सुरात गाऊ लागला. वारकरी पंथाच्या झेंड्याखाली एकत्र आलेली जनता आपल्या मायबोलीतून स्वतंत्रपणे लिहू लागली. अठरापगड जातीतून, विविध व्यवसायातून आलेल्या संतांनी आपापल्या व्यावसायिक प्रतिमाही अभंगातून आणल्या. संत चोखामेळा, बंका, कर्ममेळा, सोयराबाई यांच्याही कवितेने आपली अस्मिता सिद्ध केली. त्यांनीही विठ्ठला प्रति आपली भक्ती समर्पण केली. एवढेच नव्हे तर मंगळवेढ्याची कान्होपात्रा ही वेश्या सुद्धा वारकरी संप्रदायात सामील होऊन कवित्व करू लागली. संत ज्ञानेश्वरांनी सामान्य स्तरातील मनुष्याला ही स्वातंत्र्याची सनद मिळवून दिली. शिवाय भिन्न-भिन्न व्यवसायाच्या संतांनी व्यावसायिक प्रतिमा अभंगांमध्ये आणून कार्यक्षेत्र व त्याचा परिघ विस्तृत करून सामान्य जनांपर्यंत नेऊन ठेवला. मराठीच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करायचा असेल तर लोकभाषेच्या वापराशिवाय तरणोपाय नाही त्यांनी हेरले.

माझा मराठाचि बोलू कौतुके। परी अमृतातेही पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळविन ॥

या ध्येयाने व जिद्दीने त्यांनी दीर्घकालीन बंदिस्त ज्ञान सर्वांसाठी खुले केले व प्रत्येकाला भक्ती आणि त्याद्वारे मुक्तीचा मार्ग मोकळा करून दिला.

**५. संत ज्ञानेश्वरांची समदृष्टी** - संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पुरस्कार केला. त्यांना भक्ती मार्गात जाती व्यवस्थेची श्रेष्ठ कनिष्ठता अजिबात मान्य नव्हती. जात-पात, भाषा, वय, लिंग याचा विचार न करता उराऊरी भेटण्याचा प्रघात, साधी राहणी उच्च विचारसरणी, सर्वाभूती परमेश्वर



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

पाहण्याची वृत्ती, पंढरीची वारी व शुद्ध भक्ती भाव ही काही आचारसंहिता त्यांनी सांगितली. ज्ञानी पंडित अहंकाराच्या नशेत वावरतात ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. आपला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानी लोकांपेक्षा आर्त, उपेक्षित, अगतिक व संसारतापाने पोळलेल्या लोकांना अधिक उपयुक्त व्हावा असे त्यांना वाटत होते. त्याकाळी चातुर्वर्ण व्यवस्था समाजात रुढ होती. ज्ञानेश्वरादि भावंडांना फार मोठ्या अन्यायाला तोंड द्यावे लागले. कारण त्यांच्या वडिलांनी संन्यासाश्रम स्वीकारून पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश घेतला होता. आई-वडिलांच्या देहांत प्रायच्छित्तानंतर ही भावंडे पोरकी झाली, त्यांना वणवण भटकावे लागले. संन्याशाची मुलं म्हणून त्यांना हिणवल्या गेले. आपल्यावरील अन्याय हा त्यांना विश्वावरील अन्याय, माणुसकीवरील अन्याय वाटला. त्यांच्या दुःखाने विशाल सामाजिक दुःखाचा आढावा घेतला. त्याकरिता त्यांनी विश्वात्मक देवाजवळ प्रार्थना केली. त्याला पसायदान असे म्हणतात.

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भुता परस्परे जडो । मैत्र जिवांचे ॥
दूरीतांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो ।
जो जे वान्च्छिल तो ते लाहो । प्राणी जात ॥

मानव जातीमध्ये, मानव प्राण्यांमध्ये प्रेमाची नाती तयार होवोत. गरीब, अनाथाच्या जीवनातील अंधःकार नाहीसा होऊन तेजाचा सूर्य तळपत राहो, त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण होवोत. सर्व प्राणिमात्र गुण्या गोविंदाने नांदोत, त्यांच्यावर चांगल्या गोष्टीचा वर्षाव होवो, त्यांना परमेश्वर प्राप्ती होवो, ते एकमेकांचे सगे सोयरे होवोत, त्यांना तिन्ही लोकांचा आनंद प्राप्त होवो, हे ईश्वरा प्रसन्न होऊन मला हे प्रसादरुपी दान दे, असे सर्वात्मक



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

ईश्वराजवळ त्यांनी सर्वांच्या कल्याणासाठी दान मागितले. यातून ज्ञानेश्वरांचा समतावादी दृष्टिकोन दिसून येतो.

६. संत ज्ञानेश्वरांचा हरिपाठ - आजही खेड्यापाड्यामधून संत ज्ञानेश्वरांचा हरिपाठ मोठ्या आनंदाने, भक्ती भावाने गायला जातो. ज्ञानेश्वरांचा हरिपाठ म्हणजे वारकऱ्यांची संध्या होय. त्यांनी जीवनाचा सोपा मार्ग हरीपाठातून सांगितला. नामसंकीर्तनासारखे सोपे साधन नाही. जे घेतल्याने जन्मोजन्मीचे पापे जळून जातात. त्याकरिता काही कष्ट करावे लागत नाहीत, वनात जावे लागत नाही.

नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ॥

न लगती सायास जावे वनंतरा । सुखी येतो घरा नारायण ॥

नामस्मरणाने परमेश्वर प्राप्तीचा आनंद सहज मिळतो, अशी सोपी नाम भक्ती त्यांनी सांगितली. अत्यंत सोपा असा 'राम कृष्ण हरी' या मंत्राचा जप करावा. फक्त ही भक्ती अंत:करणातून केली पाहिजे. याकरिता योग याग, व्रत वैकल्य, जप तप, अनुष्ठान काहीही लागत नाही, तीर्थयात्रा, नवस सायास करावे लागत नाही. फक्त ही नाम भक्ती तुमच्या हृदयात फुलली पाहिजे. तुम्हाला मुक्तीचे चारही मार्ग मोकळे झाल्याशिवाय राहणार नाहीत. हे सर्व संसारामध्ये राहून करता येते. तुमच्या अंत:करणात भक्ती नसेल तर तुमची अवस्था पशु पेक्षा वाईट आहे.

हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥

अशी त्यांची हरिपाठातून शिकवण होती. म्हणून हरिपाठ म्हणजे जीवनाचा सोपा मार्ग होय. जो आबाल वृद्धांकडून अत्यंत भक्ती भावाने आजही गायला जातो.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।'



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA
Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

या उक्तीप्रमाणे जणू काही संत ज्ञानेश्वरांचा जन्म जगाचे कल्याण करण्यासाठीच झाला होता, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांनी आपल्या साहित्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान शिकविले.

संत ज्ञानेश्वर म्हणजे कैवल्याचा पुतळा, चैतन्याचा जिव्हाळा, मोक्षमार्गीचा सांगाती, शांती रूप, विठोबाचा प्राण सखा होत. त्यांची विनयशीलता, शालीनता, विद्वत्ता फार अफाट होती. त्यांच्या ज्ञानाची उंची आणि नम्रतेची खोली पाहून मन तृप्त होते. त्यांच्या नितळ पारदर्शी मनाचे चमकते प्रतीक म्हणजेच 'पसायदान' होय. त्यांनी समाजाला मानवतेचे अधिकार मिळवून दिले. अध्यात्माच्या उच्च पातळीवरून स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, एकात्मता निर्माण करून एका नव्या शांतीपर्वाला सुरुवात केली, यात अजिबात शंका नाही.

अशाप्रकारे संत ज्ञानेश्वरांनी आपल्या साहित्यातून एकात्मतेचे तत्त्वज्ञान सांगितले.

**संदर्भ सूची -**

१. तुळपुळे शं. ग., पाच संतकवी
२. पाटील सुशीला, इये मराठीचिये नगरी
३. पाटील सुशीला, साहित्य सोनियाच्या खाणी
४. उषा देशमुख, ज्ञानेश्वरी दर्शन
५. रा. तु. भगत, संतसाहित्य आणि समाजप्रबोधन

Smt. R.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, Akola



Scanned with OKEN Scanner

DR. 92208/4
August 25

# Indian Thinkers and Saint Literature – Philosophy and Influence

## भारतीय विचारवंत आणि संत साहित्य – विचारधारा आणि प्रभाव


संपादक

प्रा .डॉ. प्रशांत काटोले

डॉ.विराग गावंडे



आधार पब्लिकेशन, अमरावती.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# Index


| S.No | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Raja Ram Mohan Roy: Social and Religious Philosophy **Dr. Shivaji M. Kanfade** | 1 |
| 2 | Pandit Jawaharlal Nehru on Secularism **Dr. Umesh Vithalrao Kadu** | 10 |
| 3 | Intersecting Paths to Liberation: Learning from Ambedkar's Approaches to Caste, Class, and Gender **Dr. Sunil. A. Dhapse** | 16 |
| 4 | An Overview Of Swami Vivekananda: An Approach Of Philosophy & Reform **Dr. Sangita N. Lohakpure** | 27 |
| 5 | "Swami Vivekananda's Philosophy of Education: Man-Making, Character Building and National Regeneration" **Dr. I. D. Pawade** | 34 |
| 6 | Dr. Babasaheb Ambedkar's Political Thoughts and Actions **Prof.Dr.Rajkumar Pandhari Dasarwad** | 44 |
| 7 | संत तुकारामांचे आर्थिक विचार **प्रा .डॉ. प्रशांत काटोले** | 52 |
| 8 | संत ज्ञानेश्वर : एकत्वाचे तत्त्वज्ञान **प्रा .डॉ केशव सिताराम गोरे** | 57 |
| 9 | संत तुकाराम : अभंग आणि सामाजिक समता **प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे** | 66 |
| 10 | विनोबा भावे यांचे भूदान चळवळीतील योगदान **डॉ. आर. एम. सरपाते** | 76 |


Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

# संत तुकाराम : अभंग आणि सामाजिक समता

प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे
(मराठी विभाग)
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी - अकोला
मो. नं. ९६३७४४२९३७ मेल - keshavgore101@gmail.com

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून येथे विविध जाती धर्मांचे संत होऊन गेलेत. संतांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून समाजाची घडण केली. समाजाला एकसंघ, एकजीव करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवले. आपले संपूर्ण जीवन भक्ती रसात वाहून घेतले.

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोका ॥

असा त्यांचा समाजाप्रती दृष्टिकोन होता. संत ज्ञानेश्वरांपासून तर महान संत गाडगेबाबा पर्यंत अनेक विभूती महाराष्ट्रामध्ये होऊन गेल्या. संतांनी विविध प्रकारच्या रचना, काव्य निर्माण केले. त्यांनी अभंग, हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, भजन या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला.

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया । तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥

या उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला तर संत तुकाराम महाराज यांनी तो भागवत धर्म पूर्णत्वास नेला. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत मीराबाई, संत बहिणाबाई, संत कर्ममेळा यासारखे अठरापगड जातीचे संत महाराष्ट्रात होऊन गेले. संतांचा एकमेकांकडे बघण्याचा दृष्टिकोन



Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225
Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

समतावादी होता. पंढरपूरचा पांडुरंग हे त्यांचे आराध्य दैवत. दरवर्षी आषाढी कार्तिकी वारीच्या निमित्ताने पंढरपूरला लाखोच्या संख्येने संत, भाविक एकत्र येऊन वैष्णवांचा महामेळा साजरा करतात. या वारीत सर्व जाती-धर्मांच्या लोकांना एकत्वाचे, समतेचे, बंधुत्वाचे दर्शन घडते. अशा संतांपैकी एक महान संत म्हणजे संत तुकाराम महाराज होत. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पंढरपूरच्या पांडुरंगाचे सुंदर असे स्वरूप वर्णन केले आहे. मूळचे देहू या गावचे असणारे संत तुकाराम महाराज यांनी भंडारा डोंगरावर निसर्गाच्या सानिध्यात आपली अभंग रचना केली. संत तुकारामांची अभंगवाणी म्हणजे महाराष्ट्राचे अमूल्य असं वैचारिक धन आहे. सामान्यांपासून तर विद्वानापर्यंत तुकारामांचे अभंग सर्वांनाच आपल्याकडे आकृष्ट करून घेतात. त्यांच्या प्रत्येक अभंगात- जीवन विषयक विचार प्रकट झाला आहे. त्यांचे अभंग म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्व होय.

तुका म्हणे होय मनाशी संवाद। आपुलाचि वाद आपुल्यासी ॥

स्वतःशी संवाद करणारे तुकाराम महाराज समाजाशीही बोलत होते. ते संत, कवी व तत्वचिंतक होते. त्यांची अभंग रचना साध्या आणि सरळ भाषेत आहे. आजही ते जनमानसात अगदी रुतून बसली आहे. प्रत्येकाच्या हृदयात तिने घर केलं आहे. सामाजिक समतेच्या विचारांची चळवळ तुकोबांच्या जीवन, विचारात आणि कार्यात आढळते. सर्व जातीतल्या सर्व माणसांना हृदयाशी धरून त्यांना प्रबोधित करणारी संत तुकारामांची वाणी सरस आणि संपन्न आहे. त्यांचे कवित्व आणि संतत्व एकरूप आणि एकात्म आहे. हीच एकात्मता त्यांच्या काव्यात, अभंगात आढळते. संत तुकारामांची अभंगवाणी म्हणजे पाचवा वेद होय. त्यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान अगदी सोप्या साध्या भाषेत सांगितले आहे. म्हणून त्याचा जन माणसाने अंगीकार केला आहे.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

१. संत तुकाराम एक जाणते सुधारक - संत हे एकांतापेक्षा लोकांतात जास्त रमतात. त्यांच्या जीवनदृष्टीत करुणा, संयम, चिंतनशीलता, विनय असतो. संत तुकाराम यांनी आपल्या अभंगातून, कीर्तनातून, प्रवचनातून हजारो लोकांना नवसंजीवनी दिली. देवळातल्या देवा पेक्षा माणसातला देव ओळखावा ही त्यांच्या सामाजिक जाणिवेची खूण आहे. तीर्थी धोंडा पाणी।

देव रोकडा सज्जनी॥

असे त्यांनी लोकांना परखडपणे सांगितले. देवाचा शोध हा माणसाच्या जीवनात, त्यांच्या अंत:करणात घ्यायचा असतो. ते लोकांना खऱ्या धर्माचा आणि जीवन मार्गाचा तळमळीने उपदेश करीत असत. धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, अंगारे - धुपारे, नवसायास यांच्यावर त्यांनी वैचारिक हल्ले चढविले.

नवसे कन्या पुत्र होती। तरी का करावा लागे पती॥

नवसाने जर मुलं बाळ झाले असती, तर लग्न करण्याचे कामच नव्हते, असे ते स्पष्टपणे सांगत. मन शुद्ध असेल तर तीर्थयात्रेची गरज नाही. देवाचे दर्शन आपल्या निर्मळ हृदयातच घ्यायला पाहिजे. तो आपल्या अंतर्यामी वसलेला आहे. असे विचार त्यांनी आपल्या अभंगातून विवरून सांगितले आहेत. ते जितके संत होते तितकेच समाजसुधारकही होते. त्यांनी मानवतावादी विचारधारा सांगितली.

२. **जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती** - संत तुकारामांनी संत वृत्तीची लक्षणे सांगितली आहेत. संत कसे असावेत व त्यांनी समाजाचे हित आणि सुख हेच प्रामुख्याने डोळ्यासमोर ठेवावे, हे त्यांचे उद्दिष्ट होते. समाज सर्वांगपरिपूर्ण व्हावा आणि तो नैतिक मार्गाने चालत राहावा, त्यांच्या जीवनात प्रेम आणि शांती वृद्धिंगत व्हावी ही त्यांची इच्छा होती. संत तुकाराम यांना सनातन्यांनी खूप छळलं, त्यांची अभंग गाथा इंद्रायणीत



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

बुडवली. त्यांची शक्य तितकी अवहेलना केली. परंतु त्यांनी हा अपमान शांतपणे सहन केला.

तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥

या जगातील अज्ञानीपणा, अडाणीपणा नाहीसा करण्यासाठी संतांचे अवतार असतात. त्यांना सन्मार्ग दाखवणे हे त्यांचे काम असते. समाजाकरिता भक्तीची साधी आणि सोपी, सरळ वाट निर्माण करणे हे संतांचे काम असते असे ते म्हणत.

झाडू संतांचे मारग । आडरानी भरले जग ॥

असे म्हणत त्यांनी आपले कार्य निर्धाराने केले. संत तुकाराम हे संतवृत्तीचे चालते बोलते प्रतीक आहेत. त्यांच्या प्रत्येक शब्दातून समाजाविषयीचे वात्सल्य प्रकट झाले आहे. संत हे जगाच्या कल्याणासाठीच असतात आणि त्यांनी त्यासाठीच आपला देह चंदनाप्रमाणे झिजविला पाहिजे. प्राचीन संतांचे आदर्श रूढ करण्याकरिता तुकारामांनी धर्मसंकल्पनेत समाजनिष्ठा जागवण्याचा प्रयत्न केला.

**३. खऱ्या संतांची लक्षणे** - संत तुकारामांनी देव आणि साधू यांची अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. संतांच्या हृदयात नि:सीम करुणाभाव नांदत असतो, त्यांचं सर्व प्राणीमात्रांवर अतूट प्रेम असतं.

जे का रंजले गांजले । त्यासी जो म्हणे आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ॥

रंजले गांजले यांना आपलेसे म्हणणारे, त्यांच्यावर पुत्राप्रमाणे प्रेम करणारे, अंतर्बाह्य लोण्यासारखे मऊ असणारे, दुसऱ्याचे दुःख पाहून त्यांचे चित्त द्रवणारे, हेच खरे संत, साधू होत आणि तिथेच देव वास करतो. तुकोबांचे हे विचार उदार अशा मानवतावादाचे द्योतक आहेत. माणूस हा प्रेमाने आणि आपुलकीने जगू शकतो. ही संत प्रवृत्तीची लक्षणे संत तुकारामानी सांगितली.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

**४. वृक्षवल्ली आम्हा सोयरी** - 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हा तुकारामांचा एक प्रसन्न करणारा आणि रसज्ञ वृत्तीचं दर्शन घडवणारा अभंग आहे. ज्या भंडारा डोंगरावर निसर्गाच्या सानिध्यात संत तुकाराम यांनी अभंग गायले, तेथील प्रसन्न वातावरण यामध्ये आलेले दिसते. वृक्षवेली, पशुपक्षी म्हणजे सोयऱ्या सारखे आहेत. त्यांना वेगवेगळे पशु आणि पक्षी अगदी जवळचे वाटतात. सृष्टीचे आणि त्यांचे जन्मोजन्मीचे अनुबंध आहेत. ही एकरूपता त्यांच्या अभंगातून दिसते. माणसाने निसर्गाच्या मनमोकळ्या सहवासात राहायला आणि त्यातला आनंद भरून घ्यायला खऱ्या अर्थाने जिवंत असायला हवं. तुकोबांच्या निर्मळ, निरुपाधिक मनाचे सोज्वळ दर्शन या अभंगातून आपल्याला घडते. ते या हर्षनिर्भर वातावरणात मनाशी संवाद करतात आणि वादविवादही करतात. निसर्गावर प्रेम करा, सृष्टीचे संगीत ऐका असा संदेश ते या अभंगातून देतात.

**५. लोकजीवनाचे उद्धारक** - देव भक्ती बरोबरच शक्तीची उपासना लोकात रूढ व्हावी ही विचारवंताची भूमिका असली पाहिजे. दया आणि क्षमा या समाजधारणेला आवश्यक असतात. समाजजीवनाचा विध्वंस करणारी दुष्ट प्रवृत्ती दुर्जनात असते. ती दयाबुद्धींनी सहन न करता त्यावर घाव घालून त्याला निर्बल केल्याशिवाय सुजन समाजाची रचना कधीच करता येणार नाही.

दया तिचे नाव भूतांचे पालन । अनेक निर्दळण कंटकांचे ॥

हा सामाजिक नीतीचा खणखणीत विचार तुकाराम यांनी आवर्जून सांगितला.

'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाच्या माथी हाणू काठी ॥'

सज्जन भेटला तर त्याला कासेची लंगोटी द्यावी, पण दूर्जनावर मात्र काठीचा प्रहार केलाच पाहिजे. सतप्रवृत्ती वाढवण्यासाठी दृष्प्रवृत्तीचे माजलेले तण उपटून काढावे, सज्जनांना अभय मिळावं आणि दुष्ट भयभीत व्हावेत हेच



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

सामाजिक सुखाचे लक्षण आहे, हे आपल्या धारदार शब्दातून तुकाराम महाराज सांगतात.

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासि भेदू ऐसे ॥

प्रसंगी आम्ही मेणापेक्षाही मऊ आहोत, परंतु आमच्यावर अन्याय केल्यास आम्ही तो सहन करणार नाही, त्याला भेदून काढू. मृदुता आणि कठोरता हे दोन्ही गुण लोकमानसात पेरावे लागतात हे तुकारामांनी यातून सांगितले. संत जेवढे शांत आणि क्षमाशील असतात- तितकेच ते आक्रमक आणि प्रतिकारक्षम असतात. हे अनुकरणीय विचार तुकारामांनी मांडले आहेत. अधमाचा नाश केलाच पाहिजेत. तो करताना शुद्ध की अशुद्ध हा विचार मनात यायला नको. समाजरूपी देव्हाऱ्यावर विंचू आल्यास त्याची पूजा न करता त्याला पैजारानं ठेचलंच पाहिजे.

आजही संस्कृती आणि समाज या देव्हाऱ्यावर विषारी प्राणी येत आहेत. त्यांची दुष्टता पायातल्या वहाणेन चिरडून टाकावी. पवित्र संस्कृतीचा आणि मूल्यांचा विध्वंस करणाऱ्या व्यक्तीला आणि शक्तीला चिरडून टाकावे. तुकारामांचा हा विचार समाजाला समर्थ बनवणारा तत्वशुद्ध विचार आहे. इष्ट घडवायचं असेल तर अनिष्ट मोडावचं लागेल.

तुका म्हणे ऐशा नरा । मोजूनि माराव्या पैजारा ॥

हा त्यांचा उपदेश न्यायोचित आहे.

**६. दुःखितांचे आधारस्तंभ** - संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजातील अनेक दुःख पीडा नष्ट करण्याचे उपाय सांगितले. समाज एकरूप, एकसंघ व्हावा हा प्रयत्न त्यांचा होता. तो त्यांनी अभंगाच्या माध्यमातून प्रत्यक्षात अंमलात आणला. त्यांनी प्रारब्धवाद शिकवला नाही, तर प्रवृत्ती, पुरुषार्थ आणि प्रयत्नवाद शिकवीला. प्रापंचिक कर्तव्य सोडून संन्यास घ्यायचा आणि रानावनात भटकायचं या मार्गाचा त्यांनी निषेध केला आहे.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

न लगे सायास जावे वनांतरा । सुखी येतो घरा नारायण ॥

कर्तव्याचे पालन करावे, दु:खीतांना जवळ घ्यावे, न्यायानं धन मिळवावे आणि न्याय गोष्टीतच त्याला खर्च करावे, हा सामाजिक विचार आपल्या कीर्तन प्रवचनातून त्यांनी दिला.

' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥'

अंत:करण शुद्ध असेल तर जात, पंथ आणि वर्ण कोणताही असला तरी त्याला महत्त्व देण्याचे कारण नाही, भेदाभेद करणे हे अमंगलाचे लक्षण आहे, तो एक भ्रम आहे. सामाजिक समतेची वाट संताच्या आचार विचारातून तयार झाली. त्यात संत तुकारामांचा उल्लेख आवर्जून करायला पाहिजे. ते छळ, कपट आणि दंभ करणाऱ्या दुष्टप्रवृत्तीशी जन्मभर झगडत राहिले. प्रामाणिक भक्त असलेला महार किंवा चांभार हा श्रेष्ठ असतो, असं सांगून जीवनातल्या धार्मिकतेला आणि नैतिकतेला त्यांनी महत्त्व दिलं. त्यांनी मोठ्या निर्धाराने सामाजिक समतेचा विचार सांगितला.

**७. वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा** - संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून समाज सुधारणा घडवून आणली. तुकारामांची गाथा या ग्रंथात त्यांचे अभंग समाविष्ट आहेत. तुकारामांची अभंगवाणी म्हणजे पाचवा वेदच होय. वेदामध्ये संस्कृत मध्ये ज्ञान आहे, ते सर्वसामान्य जनतेला समजत नाही. म्हणून संत तुकाराम महाराजांनी शुद्ध मराठी भाषेमध्ये अभंग रचना केली. जीवनाचे शुद्ध तत्त्वज्ञान त्यांच्या अभंगातून झिरपताना दिसते. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात,

'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनी वाहावा भार माथा ॥'

त्याकाळी शुद्रातिशुद्रांना वेद पठणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांना त्या ज्ञानाचा लाभ होत नव्हता. शूद्रवर्णाला मुद्दामहून ज्ञानापासून वंचित ठेवले जात होते. वैदिक परंपरा विषमतावादी होती. शूद्रांना धर्मग्रंथ



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

वाचण्याची आणि मंदिरात जाण्याची बंदी होती. अशा कठोर बंधनामुळे तो समाज अज्ञानी राहिला. सर्व प्रकारच्या सामाजिक आणि अध्यात्मिक अधिकारापासून त्यांना वंचित ठेवले. त्यांनी या विषमतामुलक परंपरेच समर्थन केलं नाही. माणसाची उच्चनीचता त्याच्या अंत:करण प्रवृत्तीवर अवलंबून असते. जात आणि वर्ण यांच्याशी या गोष्टीचा काडीइतकाही संबंध असत नाही. ईश्वर भक्तीनेच माणूस श्रेष्ठ ठरू शकतो. वेदपाठ म्हणणाऱ्यांना वेद कळलेच नाहीत. त्यांनी फक्त वेदाचा भार मस्तकावर वाहला. मात्र आमच्या अंत:करणात वेदाचा अर्थ सामावलेला आहे. त्याचे फळेही आम्ही चाखत आहोत. वेद न वाचता ही वेदातलं सार आपल्या आचार विचारातून, अभंगातून तुकारामांनी मांडले आहे. साऱ्या जीवमात्रावर प्रेम वात्संल्याची पाखर घालणारे तुकाराम खऱ्या अर्थाने वेदवेत्ते होते. तुकाराम महाराजांचे हे अस्मितापूर्ण उद्गार समाजासाठी स्फूर्तीदायक आहेत. यातून त्यांची सामाजिक जाणीव प्रकट होते.

**८. तुका आकाशाएवढा** - संतसाहित्यात जातीय आणि वर्णीय विषमतेवर सर्वात प्रखर वैचारिक हल्ला संत तुकारामांनी केला. सारं जग विष्णुमय आहे, माणूस सर्वत्र एकच आहे, हा उद्घोष त्यांनी काव्यातून केला. संत तुकाराम महाराज वारकरी संप्रदायाचे कळस ठरले. त्यांच्या विचारांची उंची आकाशाला गवसणी घालणारी होती. अगदी सोप्या भाषेतून त्यांनी उच्च प्रतीचे विचार मांडले. त्यांचे विचार म्हणजे जणू काही अमृतवाणीच होय. अनेक जाती जमातीत संतांनी भागवत मंदिराची उभारणी केली. सामाजिक प्रबोधनाच्या विचारात तुकारामांनी त्यात भर टाकली. त्यांची अभंगवाणी घराघरात गेली, लोकांच्या हृदयात ठाण मांडून बसली. सामाजिक समतेच्या संदर्भातील विचार तुकारामांच्या अभंगातून, जीवन विचारातून आणि कार्यातून आढळतात. सर्व जाती धर्मातल्या सर्व माणसांना हृदयाशी धरून



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

त्यांना प्रबोधित करणारी तुकारामांची वाणी, विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टीनी सरस आणि संपन्न आहे. संत तुकाराम महाराज म्हणजे सामाजिक एकात्मतेचे प्रतीक होत. आदर्श जीवनाचे चित्र तुकाराम महाराजांनी मनःपूर्वक रंगवले आहे. ते विकृतीचे विध्वंसक आणि प्रकृतीचे उपासक होते.

जीवनाच्या शुद्धीकरणासाठी ते अखंड झगडत होते. तुकारामाची लोकप्रियता हळूहळू वाढू लागली. सत्प्रवृत्तीचा गौरव दुष्प्रवृत्तीला रुचत नाही. ते तुकारामांच्या बाबतीत घडले. त्यामुळे त्यांना अनेक अपमान सहन करावा लागला. लोकभाषेतून लोकमनाला जागवणाऱ्या या संतांच्या कीर्तन प्रवचनाला जनसमूह लोटू लागला. लोकजीवनाला सुयोग्य आकार मिळावा ही त्यांची तीव्र आकांक्षा होती. संत तुकाराम महाराज भागवत संप्रदायाचे शिल्पकारच नसून मानवतावादाचे महाराष्ट्रातील प्रणेते आणि प्रवक्ते आहेत. ज्याची स्वार्थभावना गळून गेलेली असते आणि जो समदृष्टीने साऱ्या जगाकडे पाहात असतो त्याला कोणत्याही प्रकारचा मोहपाश बांधू शकत नाही. तुकोबांच्या अभंगात त्यांच्या स्थिर, शांत, मोहरहित, स्वच्छ मनाचे दर्शन घडतं. त्यांच्या ठिकाणी आत्मबोधाचा प्रकाश झगमगू लागला. पण याकरिता त्यांना फार कठीण तपस्या करावी लागली. इच्छा वासनांचा होम करावा लागला. आत्मध्यानात सारं आयुष्य व्यतीत करावं लागलं. अज्ञानाविरुद्ध बंड पुकारावं लागलं. आपण केवळ परहीतासाठी जगणार आहोत, असे त्यांना वाटायला लागले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अत्युच्च विकास ज्ञान, करुणा, प्रेम, सर्व धर्म समभाव यातून दिसून येतो. आज आमच्या मनात असलेला तुकोबा आभाळाएवढा आहे.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-95494-62-5

संत तुकारामांनी समाजस्वास्थ्याला अनुकूल ठरणाऱ्या मानवी सदगुणांना साक्षात ईश्वराचे वजन दिले. त्यांनी खरा परमेश्वर जनतेपुढे साक्षात उभा केला.

'बुडता हे जन । न देखवे डोळा ।'

हा कळवळा त्यांच्या काव्यातून दिसतो. तुकारामांच्या धर्मसंकल्पनेला समाजहितपरतेचा भरभक्कम आधार आहे. या समाजात त्यांना देवत्वाची प्रतीती जाणवते. असा समाजसापेक्ष धर्मविचार शाश्वत जीवन मूल्यांना धरून असतो. त्यामुळे तो नेहमीच निर्विवाद असतो, सर्वमान्य असतो. संत तुकारामांच्या या चिरंतन धर्मसंकल्पनेमुळेच संत बहिणाबाईची 'तुका झालासे कळस' ही उक्ती सार्थ ठरते. अशाप्रकारे संत तुकारामांच्या अभंगातून सामाजिक एकात्मता दिसून येते आणि म्हणावेसे वाटते,

हेचि दान देगा देवा । तुकोबाचा विसर न व्हावा ॥

यापेक्षा अधिक मागण्यासारखं काही नाही.

**संदर्भ ग्रंथ -**

१. फडकुले निर्मलकुमार, संत तुकारामांचा जीवन विचार
२. भगत रा. तु., संत साहित्य आणि समाजप्रबोधन
३. पाटील सुशीला, साहित्य सोनियाचिया खाणी
४. संत तुकाराम अभंग गाथा



Smt. P.D. Patil Social Work College ☆Khadki, AKOLA☆ College Code 225

Scanned with OKEN Scanner

# Exploring Growth of India
## A Multidiminsional Journey

( भारताच्या विकासाची बहुआयामी प्रक्रिया )



EDITOR

Prof. Dr. Balaji Kamble

Dr. Nilam Chhangani

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | पंचायत राज आणि ग्रामीण नेतृत्वाचा विकास | प्रा. नितीन जी. पाटील | 190 |
| 42 | ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका | डॉ. नंदकिशोर पंढरीनाथ अवचार | 194 |
| 43 | डिजिटल शिक्षण आणि ग्रामीण भागातील आव्हाने | डॉ. वर्षा नारायण शर्मे | 199 |
| 44 | नवीन शैक्षणिक धोरण दृष्टीकोन-२०२० मध्ये प्रशासनाचा दृष्टीकोन | प्रा.वैशाली तुकाराम गीरे | 202 |
| 45 | भारतीय उद्योगांचे अर्थव्यवस्थेतील योगदान | डॉ. विष्णू नंदकिशोर पवार | 206 |
| 46 | ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदल आणि परिणाम | डॉ. संदिप नामदेव शिंदे | 211 |
| 47 | शाश्वत विकास | डॉ. नेनपाळा शिवाजी नागरे | 214 |
| 48 | विकास व पर्यावरण | प्रा. डॉ. रवींद्र दा. इंगे | 219 |
| 49 | पर्यावरण, ऊर्जा व शाश्वतता : एक शाश्वत भविष्याची दिशा | सौ. गौरी राजेशकुमार शिंदे | 223 |
| 50 | मानव विकास : बहुआयामी विकास संकल्पना | प्रा. प्रकाश नामदेव शिंदे | 225 |
| 51 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि आधुनिक राष्ट्रनिर्मिती | डॉ. शिवाजी गाडे | 230 |
| 52 | भारतीय संविधान निर्मिती आणि आधुनिक राष्ट्र राज्याचा उदय | प्रा. एस. डी. मुळे | 234 |
| 53 | भारताच्या सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक घटनांचे आधुनिक समाजावर प्रभाव | डॉ. अशोक गंगाराम सावळे | 237 |
| 54 | भारताची लोकसंख्या वसाहतीची भौगोलिक रचना आणि विकासाची दिशा | डॉ. कौडीबा रामराव कांदे | 241 |


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

ISBN : 978-81-980457-9-9

# • Exploring Growth of India : A Multidiminsional Journey

Editor : Prof. Dr. Balaji G. Kamble
Dr. Nilam Chhangani

Copyright © Authors 2025

• **Publisher**

**Jyotichandra Publication**
Gyandev Parvati niwas, LIC Colony
Pragati Nagar, Latur. 8484818000

• **Type Setting :** Vikas Dhamale

• **Cover Page:** Chandrakant B. Kamble

• **Printer :**
Indovision Offset Printing & Binding
LIC Colony, Latur. 8484818000

**First Editon : 15 Aug. 2025**

---

**Note :** All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or other electronic or mechanical methods, without the written permission of the publisher and the Author.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 41 | पंचायत राज आणि ग्रामीण नेतृत्वाचा विकास - प्रा. [illegible] | 190 |
| 42 | ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका - डॉ. गणेशराम परशराम आवचार | 194 |
| 43 | डिजिटल शिक्षण आणि ग्रामीण भागातील आव्हाने - डॉ. [illegible] | 199 |
| 44 | नवीन शैक्षणिक धोरण दृष्टीकोन-२०२० मध्ये [illegible] दृष्टीकोन - प्रा.वैशाली तुकाराम [illegible] | 202 |
| 45 | भारतीय उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील योगदान - डॉ. विष्णू गणेशराम पवार | 206 |
| 46 | ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदल आणि परिणाम - डॉ. संदिप नामदेव शिंदे | 211 |
| 47 | शाश्वत विकास - डॉ. वेदप्रकाश शिवाजी जाधव | 214 |
| 48 | विकास व पर्यावरण - प्रा. डॉ. रविंद्र मा. इंगे | 219 |
| 49 | पर्यावरण, ऊर्जा व शाश्वतता : एक शाश्वत भविष्याची दिशा - प्रो. गौरी राजेंद्रकुमार शिंदे | 223 |
| 50 | मानव विकास : बहुआयामी विकास संकल्पना - प्रा. प्रकाश नामदेव शिंदे | 225 |
| 51 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि आधुनिक राष्ट्रनिर्मिती - डॉ. शिवाजी गाढे | 230 |
| 52 | भारतीय संविधान निर्मिती आणि आधुनिक राष्ट्र राज्याचा उदय - प्रा. एस. डी. मुळे | 234 |
| 53 | भारताच्या सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक बदलांचे आधुनिक समाजावर प्रभाव - डॉ. अशोक गंगाराम साबळे | 237 |
| 54 | भारताची लोकसंख्या वसाहतीची भौगोलिक रचना आणि विकासाची दिशा - डॉ. कोकीळा रामराव कांदे | 241 |


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

(12)

# ग्रामीण विकासामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका

डॉ. बळीराम परशराम अवघार
सहयोगी प्राध्यापक (समाजशास्त्र),
श्रीमती पंचफुलादेवी पाटील
समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.

**प्रस्तावना :**

भारतीय समाजाचा मोठा भाग ग्रामीण भागात राहतो. भारताच्या लोकसंख्येच्या जवळपास 65 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण विकास हा कोणत्याही देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत ग्रामपंचायती हा एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्थेतील मूलभूत यंत्रणा आहे. गावाच्या प्रशासनाचा, विकासाचा आणि जनतेच्या सहभागाचा केंद्रबिंदू म्हणून ग्रामपंचायतीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.

ग्रामीण भारताच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी ग्रामपंचायत ही अत्यंत महत्वाची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. गावातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामपंचायतीचे योगदान अनन्यसाधारण आहे. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असून, गावातील लोकशाहीच्या मुळाशी असलेली संस्था म्हणून ती गावकऱ्यांच्या गरजा, अपेक्षा आणि समस्या शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम करते.

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थानिक स्तरावर नियोजन, निधीचे योग्य व्यवस्थापन, संसाधनांचा वापर, पारदर्शकता आणि लोकसहभाग या सर्व गोष्टी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शक्य होतात. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते.

**ग्रामपंचायतीचा परिचय:**

ग्रामपंचायत ही भारतातील त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेतील पहिली पातळी आहे. इतर दोन स्तर म्हणजे पंचायत समिती (तालुका पातळी) आणि जिल्हा परिषद (जिल्हा पातळी).ग्रामपंचायत ही लोकशाही विकेंद्रीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे. यामुळे गावातील लोकांना स्वतः:च्या समस्या सोडवण्यासाठी आणि विकासाच्या निर्णयात भाग घेण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळते. गावाच्या गरजा आणि प्राधान्यानुसार स्थानिक पातळीवर निर्णय घेतले जातात, त्यामुळे विकास अधिक प्रभावी होतो.

**ग्रामपंचायतीची रचना खालीलप्रमाणे असते:**

**ग्रामसेवक:** हा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय अधिकारी असतो. त्याची नेमणूक सरकारद्वारे केली जाते आणि तो ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजाची देखरेख करतो.

**सरपंच:** सरपंच हा ग्रामपंचायतीचा प्रमुख असतो आणि तो थेट जनतेतून निवडला जातो. गावाच्या विकासाचे निर्णय घेण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते.



**उपसरपंच:** उपसरपंच सरपंचाच्या अनुपस्थितीतकार्यभार सांभाळतो.

**सदस्य (ग्रामपंचायत सदस्य):** हे सदस्य गावातील प्रभागांमधून (वॉर्ड) निवडले जातात. त्यांची संख्या गावाच्या लोकसंख्येनुसार ठरते.

ग्रामपंचायतीची रचना 73 व्या घटनादुरुस्तीनंतर (1992) अधिक मजबूत झाली. या दुरुस्तीनुसार संविधानात 11वी अनुसूची समाविष्ट करण्यात आली, ज्यात ग्रामपंचायतीना दिलेली 29 कार्ये नमूद आहेत.

**अ. ग्रामीण विकासासाठीग्रामपंचायतीची प्रमुख कार्ये:**

ग्रामपंचायतीची अनेक महत्त्वाची कार्ये आणि जबाबदाऱ्या आहेत.त्यांपैकीग्रामीण विकासासाठी ग्रामपंचायतीची प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**1. आधारभूत सेवा व पायाभूत सुविधा निर्माण:**

ग्रामपंचायती प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शौचालये, जलसंपत्ती, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा, कचरा व्यवस्थापन इ. गोष्टींची व्यवस्था करतात.

**2. शिक्षण क्षेत्रात योगदान:**

ग्रामपंचायती गावातील प्राथमिक शाळांचे देखभाल, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन योजना, वाचनालये, शालेय पोषण आहार योजना राबवतात.

**3. आरोग्य व स्वच्छता:**

पाणी पुरवठा, स्वच्छता मोहिमा, रोग प्रतिबंधक लसीकरण, गावकऱ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती इ. कामे ग्रामपंचायत करत असते.

**4. रोजगार निर्मिती:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) सारख्या योजनांद्वारे ग्रामपंचायती गावकऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देतात.

**5. सामाजिक कल्याण योजना राबवणे:**

जसे की वृद्धापकाळ पेन्शन, विधवा साहाय्यता, गरोदर माता योजनांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते.

**6. कृषी व जलसंधारण क्षेत्रात कार्य:**

बांधबंदिस्ती, शेततळे, सिंचन प्रकल्प, कृषी प्रशिक्षण शिबिरे इत्यादी उपक्रमांद्वारे ग्रामपंचायती कृषी आणि जलसंधारणात हातभार लावतात.

**7. स्त्री सक्षमीकरण व बालकल्याण:**

महिला बचत गट, स्वयंसहायता गटांना मदत, बालश्रम निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध यामध्येही ग्रामपंचायतीचा सहभाग असतो.

**ब. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची काही प्रमुख उदाहरणे:**

**उदाहरण 1: हिवरे बाजार (महाराष्ट्र)**

ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या गावात जलसंधारण, वृक्षलागवड, स्वच्छता आणि आर्थिक विकासात भरघोस प्रगती झाली.

**उदाहरण 2: पिपलांत्री (राजस्थान)**

ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने प्रत्येक मुलीच्या जन्मानंतर 111 झाडे लावली जातात. या माध्यमातून पर्यावरण संरक्षण

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

[illegible] आणि सामाजिक [illegible] निर्माण झाली.

ड. ग्रामपंचायतीच्या कार्यातील अडचणी:

1. निधीची कमतरता आणि [illegible] वापर:

ग्रामपंचायतीकडे [illegible] निधी मर्यादित असतो, त्यामुळे सर्व गरजा पूर्ण करणे कठीण जाते. मिळालेल्या निधीचा [illegible] व [illegible] विकासकामे अपूर्ण राहतात.

2. अपुरी तांत्रिक आणि प्रशासकीय क्षमता:

ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारी यांना आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव असतो, त्यामुळे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.

3. लोकसहभागाचा अभाव:

ग्रामसभेत कमी नागरिक उपस्थित राहतात, त्यामुळे गावातील सर्व घटकांचे प्रश्न आणि गरजा समजून घेणे कठीण होते.

4. तज्ञ व्यक्तींची अनुपलब्धता:

[illegible] आराखडा तयार करताना तज्ञ व्यक्ती किंवा मार्गदर्शकांची उपलब्धता कमी असते, त्यामुळे योजनांमध्ये त्रुटी राहतात.

5. माहिती व पारदर्शकतेचा अभाव:

गावातील नागरिकांना विकासकामांची माहिती वेळेवर मिळत नाही किंवा कामांची पारदर्शकता कमी असते, त्यामुळे गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार वाढू शकतो.

6 स्थानिक राजकीय हस्तक्षेप:

काही वेळा स्थानिक राजकारणामुळे निर्णय प्रक्रियेत अडथळे येतात आणि विकासकामे विलंबित होतात.

7. [illegible]:

काही लोकप्रतिनिधी किंवा नागरिकांना ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीची माहिती नसते, त्यामुळे ते सक्रिय [illegible].

8. अपुरी कर्मचारी संख्या:

अनेक ग्रामपंचायतींमध्ये आवश्यकतेपेक्षा कमी कर्मचारी असतात, त्यामुळे प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण होत नाहीत [illegible] अडचणींमुळे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि गावाचा सर्वांगीण विकास [illegible].

इ. ग्रामपंचायती सक्षम [illegible] उपाययोजना:

1. आर्थिक स्वावलंबन [illegible]:

स्थानिक कर, [illegible] कर, बाजारपेठ व्यवस्थापन, मालमत्ता भाड्याने देणे यासारख्या विविध स्त्रोतांद्वारे ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढवावे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा निधी प्रभावीपणे वापरावा आणि त्याचा योग्य हिशेब ठेवावा.

2. लोकसहभाग आणि पारदर्शकता:

ग्रामविकास आराखडा (GPDP) तयार करताना ग्रामसभा, गावकरी आणि स्थानिक स्वयंसेवक यांचा सहभाग वाढवावा. निर्णय प्रक्रिया पारदर्शक ठेवावी, सर्व बैठका नियमितपणे घेऊन ग्रामस्थांना माहिती द्यावी. ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांचा सहभाग वाढवणे आवश्यक आहे.



3. प्रशासनिक क्षमता व नियोजन:

सदस्य, सरपंच, ग्रामसेवक यांचे प्रशिक्षण व क्षमता विकास कार्यक्रम राबवावेत. गावातील समस्या ओळखून, त्यावर शाश्वत विकासाच्या ध्येयांनुसार योजनाबद्ध उपाययोजना कराव्यात. ग्रामसेवक, सरपंच व सदस्यांना शासनस्तरावरून नियमित प्रशिक्षण दिले पाहिजे.

4. तांत्रिक व डिजिटल सक्षमता:

इंटरनेट, डिजिटल साधने, ऑनलाईन सेवा यांचा वापर करून प्रशासन सुलभ करावे. सरकारी योजनांची माहिती, निधी वितरण, आरोग्य, शिक्षण यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा.

5. स्वतंत्र उत्पन्न साधने विकसित करणे:

ग्रामपंचायत मालकीच्या मालमत्ता, दुकाने, पर्यटन, शेतीपूरक उद्योग यांचा विकास करून स्व-उत्पन्न वाढवावे.

6. नियमित मूल्यांकन आणि सुधारणा:

ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे नियमित मूल्यांकन करावे व आवश्यक तेथे सुधारणा कराव्यात. यामुळे ग्रामपंचायती आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात. ग्रामपंचायतीचे कार्य सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून नियमित तपासले गेले पाहिजे.

7. निधीचे नियोजनबद्ध वाटप व पारदर्शकता:

ई-गव्हर्नन्स, ई-ग्रामस्वराज पोर्टलचा प्रभावी वापर करून निधीचा पारदर्शक वापर केला पाहिजे.

8.महिलांचा व तरुणांचा सहभाग:

महिला सरपंच, युवक प्रतिनिधी यांना प्रोत्साहन देऊन नवचैतन्य आणता येईल.

इ. पंचायतराज व ग्रामपंचायतीतील कायदेशीर बाबी:

1. संविधानिक तरतुदी:

भारताच्या संविधानातील भाग IX (कलम 243 ते 243-O) पंचायत राज संस्थांना कायदेशीर मान्यता देतो. 1992 च्या 73व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेला संविधानिक दर्जा मिळाला आहे.

पंचायत राज तीन स्तरांमध्ये कार्यरत असतो: ग्रामपंचायत (गाव), पंचायत समिती (तालुका/मंडळ), जिल्हा परिषद (जिल्हा).

ग्रामसभा ही पंचायत राज व्यवस्थेची मूलभूत एकक आहे. ग्रामसभेतील सर्व नोंदणीकृत मतदार सदस्य असतात.

2. ग्रामपंचायतीचे कायदेशीर नियम (महाराष्ट्र संदर्भात):

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1958 नुसार ग्रामपंचायतीची स्थापना, रचना, निवडणूक, अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. ग्रामपंचायत सदस्यांची निवड थेट मतदानाने होते. सदस्य होण्यासाठी किमान वय 21 वर्षे असावे लागते.

सदस्यपदासाठी पात्रता: ग्रामसभेचा सदस्य असणे, मतदार यादीत नाव असणे, वयोमर्यादा पूर्ण करणे.

आरक्षण: अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग व महिलांसाठी जागा राखीव आहेत. महाराष्ट्रात महिलांसाठी 50% आरक्षण आहे.

कार्यकाळ: ग्रामपंचायतीचा कार्यकाळ 5 वर्षांचा असतो. विघटन झाल्यास 6 महिन्यांत निवडणूक घेणे बंधनकारक आहे. निवडणूक, अपात्रता, पद रिक्त होणे, अपील, निवडणूक यंत्रणा यांसाठी स्वतंत्र तरतुदी आहेत.

Smt. P.D. Patil ... Work College
College Code 225
Khadki AKOLA

Scanned with OKEN Scanner

**3. अधिकार व कर्तव्ये:**

ग्रामपंचायतींना 29 विषयांवर स्थानिक प्रशासन, विकास, कर वसुली, पाणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, बाजारपेठ, रस्ते, इ. अधिकार व जबाबदाऱ्या आहेत.पंचायत निधी, हिशोब व लेखापरीक्षणासाठी राज्य वित्त आयोगाची शिफारस लागू होते.

**4. इतर कायदेशीर बाबी:**

निवडणुकीतील गडबड, अपात्रता, भ्रष्टाचार, निवडणूक रद्द, अपील, इ. संदर्भात स्वतंत्र तरतुदी आहेत.न्यायालये पंचायत निवडणुकीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करू शकत नाहीत; फक्त निवडणूक याचिकेद्वारेच आव्हान देता येते.

या सर्व कायदेशीर बाबी ग्रामपंचायतीच्या पारदर्शक व उत्तरदायी कारभारासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

फ. नवीन तंत्रज्ञानाचा वापर ग्रामपंचायतीसाठी:

1. ई-ग्रामस्वराज पोर्टल - ग्रामपंचायतीचे आर्थिक व्यवहार व कामांची माहिती ऑनलाईन उपलब्ध.
2. डिजिटल इंडिया मिशन - इंटरनेट व तांत्रिक ज्ञानाद्वारे प्रशासन सुलभ करणे.
3. मोबाईल ॲडप्स - PMAY, MGNREGA, SBM, UJALA यासारख्या योजनांच्या कार्यक्षम अंमलबजावणीस मदत.

**निष्कर्ष:**

ग्रामीण विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, जी केवळ भौतिक विकासापुरती मर्यादित नसून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचाही भाग आहे. या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामपंचायतीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सक्षम, पारदर्शक आणि लोकसहभागी ग्रामपंचायतीच खऱ्या अर्थाने 'सशक्त भारताचे' स्वप्न पूर्ण करू शकतात. त्यामुळे ग्रामपंचायतींना आर्थिक, तांत्रिक व प्रशासनिकदृष्ट्या बळकटी देणे ही काळाची गरज आहे.

## संदर्भ सूची

1. भारतीय संविधान - 73 वी घटनादुरुस्ती
2. भारत सरकार - पंचायतराज मंत्रालय वेबसाइट
3. विविध राज्यांचे पंचायतराज कायदे
4. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार
5. महाराष्ट्र शासनाची ग्रामविकास योजना माहिती पुस्तिका

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

15 August 2025

ISBN-978-93-95494-83-0

# Environment and Humanity: An Interdisciplinary Approach

"पर्यावरण आणि मानवता : एक आंतरशाखीय दृष्टिकोन"

An Edited Book

by

**Editor**

Prof. Dr. Phula Rangrao Khandekar

Associate Professor, hod Department of Geography, G. T. Patil Arts, Commerce and Science College, Nandurbar, Dist. Nandurbar.

**Published By Aadhar International Publications Amaravati**

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

ISBN-978-93-95494-83-0


| | | |
|---|---|---|
| 21 | गांधीवादी पर्यावरण विचार मनिष बबनराव पांडे | 162 |
| 22 | मातृत्व व बालसंगोपनातील भौगोलिक अडथळे: राष्ट्रीय स्तरावरील संशोधन आणि धोरणात्मक उपाययोजना अनिकेत विरेंद्र वानखडे | 168 |
| 23 | नंदुरबार जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा आढावा प्रा. बापू हिलाल सामुद्रे | 176 |
| 24 | पर्यावरणीय साधन संपत्तीचे व्यापरातून महत्व व व्यवस्थापन डॉ. मनिष मोतीलाल सावंत | 189 |
| 25 | भारतीय संविधानातील पर्यावरण विषयक कायदा: एक राजकीय आढावा प्रा. ज्ञानेश्वर माधवराव सुपलेकर | 199 |
| 26 | 'स्थानीय स्वराज्य संस्था व पर्यावरणीय व्यवस्थापन' कुणाल दिलीप राठोड | 217 |
| 27 | पर्यावरण आणि मानव डॉ. कविता ज्ञानेश्वर कावरे | 225 |
| 28 | संत एकनाथ : समाजाभिमुख संतकवी डॉ. महेंद्र द. झलके | 230 |
| 29 | भारतातील जैवविविधता व संवर्धन एक भौगोलिक अभ्यास डॉ. अमोल रामेश्वरराव भुयार डॉ.रुपेश देवरे | 242 |
| 30 | महात्मा गांधींचे पर्यावरण विषयक विचार आणि समकालीन परिप्रेक्ष प्रा. विकास वसराम आडे , प्रा. डॉ. राजेंद्र ओंकार बेलोकार | 264 |
| 31 | पंचायतराज व्यवस्थेची पर्यावरण संवर्धनातील भूमिका डॉ.अशोक सुखदेव राठोड | 281 |


Smt. P.D. Patil Social Work College College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISBN-978-93-95494-83-0

# पर्यावरण आणि मानव

प्रा. डॉ. कविता ज्ञानेश्वर कावरे
श्रीमती पि.डी. पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला
9423129703

---

पर्यावरण आणि मानव

पर्यावरण आणि मानव यांचा संबंध नैसर्गिक आहे, कारण मानव पर्यावरणातून पाणी हवा अन्न आणि इतर संसाधने मिळवतो. मानवी कृतीमुळे पर्यावरणावर परिणाम होतो आणि पर्यावरणाच्या स्थितीचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होतो, पर्यावरणाचे रक्षण करणे मानवासाठी आवश्यक आहे, कारण यामुळे पृथ्वीवरील जीवन टिकून राहते आणि संसाधनांचा शाश्वत वापर शक्य होतो.

पर्यावरण

पर्यावरण म्हणजे सजीवांच्या सभोवतालचा नैसर्गिक परिसर ज्यामध्ये हवा, पाणी, जमीन, सूर्यप्रकाश, आणि इतर सजीव व निर्जीव घटक यांचा समावेश असतो

पर्यावरण आणि मानवाचे नाते

पर्यावरण आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी पुरवते जसे की शुद्ध हवा पाणी आणि अन्न

जैविक आणि अजैविक घटकांच्या आंतरक्रियेतून पर्यावरण बनते ज्यामध्ये हवा, पाणी, जमीन, सूर्यप्रकाश आणि इतर सजीव घटकांचा समावेश असतो

चांगले आणि स्वच्छ वातावरण मानवी आरोग्यासाठी फायदेशीर आहे तर दूषित आणि धोकादायक वातावरण आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

पर्यावरणाचे संरक्षण करणे हे मानवाचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे. जेणेकरून पृथ्वीवरील जेवण टिकूनराहू शकेल. नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे.

निरोगी आणि स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार मानवी हक्कांशी जोडलेला आहे.

पर्यावरण आणि निसर्गाचे संरक्षण करण्याचे हेतूने ही एक सामाजिक चळवळ आहे.

पर्यावरणाचे घटक



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

पर्यावरण म्हणजे सजीव आणि निर्जीव घटकांचा समावेश असलेला सभोवतालचा परिसर जात हवा, पाणी, जमीन , वनस्पती, प्राणी, आणि सूक्ष्मजीव यांचा समावेश होतो. हा नैसर्गिक परिसर आपल्या जीवनावर आणि पर्यावरणावर परिणाम करतो, त्यामुळे पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील जीवनाला टिकवून ठेवणारे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. पर्यावरणाचे मुख्यत्वे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१. जैविक घटक_( सजीव घटक) वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यांचा यात समावेश होतो

२. जैविक घटक-( निर्जीव घटक) यात हवा, पाणी, माती, सूर्यप्रकाश, तापमान आणि खनिजे यासारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश होतो.

पर्यावरणाचे महत्त्व

पर्यावरण आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत गोष्टी पुरवते. जसे की हवा, आणि, अण्णा आणि निवासस्थान . या घटकांमुळे पृथ्वीवरील जीवनात वाढ होते आणि ते टिकून राहते. आपण सर्व पर्यावरणाचा अविभाज्य भाग आहोत आणि त्याचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. पर्यावरण हा नैसर्गिक जगाचा एक महत्त्वाचा भाग आहे पर्यावरणाचे महत्त्व अनमोल आहे कारण ते आपल्याला शुद्ध हवा पाणी आणि अन्न यासारख्या जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत गोष्टी पुरवते. पर्यावरण नैसर्गिक संतुलन राखते आणि मानवी जीवन तसेच इतर सर्व सजीव सृष्टीसाठी आधार देते, म्हणून त्यांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे यात सजीव आणि निर्जीव घटक समाविष्ट आहेत जे एकमेकांवर अवलंबून असतात.

१ जीवन जगण्यासाठी आवश्यक-

पर्यावरण आपल्याला श्वास घेण्यासाठी हवा, पिण्यासाठी पाणी आणि शरीराचे पोषण करण्यासाठी अन्न पुरवते.

२ नैसर्गिक संसाधने-

पर्यावरण आपल्याला नैसर्गिक संसाधने पुरवते, जी मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरली जातात.

३ नैसर्गिक संतुलन-

पर्यावरण एक नैसर्गिक संतुलन राखते जे पृथ्वीवरील जीवन टिकून ठेवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

४ हवामान बदल-



Smt. P.D. Patil Social Work College College Code 225 Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN-978-93-95494-83-0

पर्यावरणाचे आरोग्य हवामान बदलाचा सामना करण्यासाठी परिसंस्थाची क्षमता ठरवते.

५ सजीव सृष्टीचा आधार-

पर्यावरण सर्व सजीव आणि निर्जीव घटकांचा समावेश करते, जे एकत्रितपणे पृथ्वीवरील सजीव सृष्टीला आधार देते.

पृथ्वीवर सर्वात बुद्धिमान जर कोणी असेल तर तो म्हणजे मानव. त्यामुळे त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र परतफेड करण्याचे साप विसरला. एखाद्या व्यक्तीकडून व समाजाकडून जेव्हा आपण मदत घेतो तेव्हा त्याच्याप्रती नेहमी कृतज्ञ राहतो, हा नियम पर्यावरणाची मानवाने कधीही पाळला नाही. त्यामुळे आज पर्यावरण वाचवा यासारखी वाक्यात आणि पडतात. सर्वप्रथम मी पर्यावरणाचा एक घटक आहे याची भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. ज्या प्रकारे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबाचा एक घटक असल्याचे भान ठेवून वागतो, त्यामुळेच त्या कुटुंबात सुख समृद्धी आणि स्थिरता दिसून येते. कुटुंबातील एक व्यक्ती जरी बेजबाबदारपणे वागला तर संपूर्ण कुटुंबाला त्याचे फळ भोगावे लागते पर्यावरणाचेही तसेच आहे.

पर्यावरणाचे माझ्यावर कर्ज आहे आणि ते मला फेडायचे आहे हेही ध्यानात असू द्यावी. पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे वाढती लोकसंख्या हेही एक प्रमुख कारण आहे. आपण अन्नाशिवाय एखादा दिवस, पाण्या वाचून एखादा दिवस जिवंत राहू शकतो मात्र हवेतील ऑक्सिजन शिवाय क्षणभर सुद्धा जिवंत राहू शकत नाही. आणि त्याच ऑक्सिजन निर्मितीचे सर्वात मोठे कार्य हे परिसरातील वृक्ष करीत असतात. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात आणि हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड म्हणजेच खराब हवा शोषून घेऊन उपयुक्त अशी शुद्ध हवा हवेत सोडत असतात. आज जंगलतोड फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. जंगले वाचविण्यासाठी लोकांमध्ये जागृती करण्यासाठी सुंदरलाल बहुगुणा यांनी चिपको आंदोलन. चालविले आणि त्यात यशस्वी सुद्धा झाले. वृक्षाचे महत्व अपरंपार आहे हे आपले पूर्वक सुद्धा जाणून होते. संत तुकाराम महाराज याविषयी म्हणतात, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी पक्षीही सुस्वरे आळविती. खरेच हे वृक्ष आपले सगळे सोयरे नातलग मित्र परिवार आहे.

नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये सौर ऊर्जा ही कधीही ना संपणारी संपत्ती आहे. भविष्यात सौर ऊर्जेच्या वापरात वाढ करणे म्हणजेच एक प्रकारे पर्यावरणाला हातभार लावण्यासारखे आहे. पेट्रोल डिझेल यासारख्या इंधनाचा मर्यादित साठा



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

भविष्यात संपण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा जपून वापर करण्यातच शहाणपणा आहे. सोबतच अमर्यादित अशा सौर ऊर्जेचा इंधनासाठी पर्याय म्हणून वापर करण्यासाठी सुरुवात केल्यास भविष्यातील अनेक संकटापासून मुक्तता मिळू शकेल आज ज्या सौरऊर्जेचा वापर नगण्य स्वरूपात आहे म्हणजेच पूर्णपणे वाया जात आहे त्याचा अनेक माध्यमातून वापर करता येऊ शकतो आणि पर्यावरणाचा समतोल थांबविता येऊ शकतो.

पर्यावरणाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, पर्यावरणाच्या सर्व घटकांमध्ये सतत क्रिया प्रतिक्रिया घडत असतात त्यांची नियम पाळणे गरजेचे असते परंतु मानवाच्या अति स्वार्थी वर्तनामुळे पर्यावरणातील समतोल बिघडत जात आहे. पर्यावरणाचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे ज्या प्रकारे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबास सुखी समृद्धी आणि स्थिरता दिसून येण्यासाठी कुटुंबातील एक व्यक्ती जरी बेजबाबदारपणे वागला तर त्याचे फळ सर्वांना भोगावे लागते त्याचप्रमाणे पर्यावरणाची ही आहे म्हणून पर्यावरणात इंधन कमी करणे जंगलतोड थांबवणे वृक्षाचे संरक्षण करणे शहरीकरणाचे शास्त्रशुद्ध नियोजन करणे आरोग्य व्यवस्था बळकट करणे असे केल्यास सर्वांना त्याचा योग्य लाभ मिळेल. पर्यावरणातील हवा पाणी अन्न हे घटक सुद्धा महत्त्वाचे आहेत इतर सर्व सजीवांचे जगणे आरोग्यवर्धक आणि शक्तीवर्धक पर्यावरणामुळे राहू शकते मानवाने पौष्टिक अन्नाची व निरोगी प्रदूषित जमिनीची काळजी घेतली पाहिजे यासाठी प्रत्येक भागात पर्यावरणाची व्यवस्थापन करणे पर्यावरणाचा विकास करणे आवश्यक जे प्रमाण पर्यावरण आपल्या गरजांची पूर्तता करते. पर्यावरणाचे आपण वारसदार आहोत आपल्याला जगवणारा जन्म देणारा घटक म्हणून पर्यावरणास ओळखले जाते म्हणून त्याचे कायमस्वरूपी व्यवस्थापन नियोजन करणे आपले कर्तव्य आहे. जंगली जमीन हवा पाणी वनस्पती खनिजे यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे परंतु मानवाकडून नैसर्गिक साधनसामग्रीचा अमर्यात वापर केला जात आहे त्यातून वाढत्या कारखानाच्या दाटीमुळे प्रदूषणाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पर्यावरणाचे संतुलनासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करण्याची गरज आहे यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने जगातील सर्व लोकांची पर्यावरणाची समस्या कडे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांच्या जागृती निर्माण करण्यासाठी 22 मार्च हा वन दिन व पाच जून जागतिक पर्यावरण दिन तसेच 16 सप्टेंबर ओझोन दिन 28 सप्टेंबर हरित ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो 21 व्या षटकार वातावरणातील तापमान वाढण्याचे प्रमाण जास्त आहे अशाच प्रकारे



D. Patil Social Work Col

Scanned with OKEN Scanner

ISBN-978-93-95494-83-0

जर तापमानाचा परिणाम पावसाच्या प्रमाणावर होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

भारतात पर्जन्यमानात खूप चढ-उतार होऊन पूर दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. भारतात पूर्व किनारपट्टीवर नदी तलावाच्या वाढत्या प्रदूषणामुळे पिण्याचे पाणी अंतर्गत मासेमारी भयानक संकट कोसळले आहे त्यामुळे मच्छीमारांची स्थलांतर वाटोळ आहे कलकत्ता जवळ सालार सरोवराची सर्वत्र अशी अनेक सरोवरे निर्माण होण्याचा धोका आहे सांडपाणी कीटकनाशकाचा वापर खते सॉल्ट अशा अनेक कारणामुळे सागर सरोवर महासागर नदी नाले धोक्यात येत आहे हे ओळखूनच मानव आणि वेळीच पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय राहिले पाहिजे सूक्ष्मजीव वनस्पती प्राणी यामधील जैवविविधता जतन केली पाहिजे कारण जैवविविधता हा देशाला वरदानच ठरलेली आहे यात पशुपक्षी सूक्ष्मजीव यांची विपुलता अधिक आढळते. भारत हा जैवविविधता संपन्न देश आहे जैवविविधतेचा संतुलित वापर करून तो बलशाली बनू शकतो यासाठी जैवविविधता संपुष्टात येणार नाही याची काळजी घ्यावी लागते शिवाय पर्यावरणाची स्थिती सुधारण्यासाठी पर्यावरणाचा विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे गरजेचे आहे.

सारांश

वरील विवेचनावरून आपणास असे निश्चित होते की पर्यावरणाची संरक्षण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे प्रत्येकाने एक शपथ घ्यावी एक मूल एक झाड याप्रमाणे कार्य करीत राहिल्यास पर्यावरण एकदम सुख सफल संपूर्ण होण्यास वेळ लागणार नाही आणि मानव जीवन निरोगी आनंदमय जीवन सतत जगत राहील. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे या जाणिवेतून सक्रिय बनल्यास पर्यावरणाची गुणवत्ता उंचावण्यास मदत होईल यात काही शंकाच नाही

संदर्भ ग्रंथ सूची

१. मोहन बावरे, पर्यावरण शास्त्र

२. चौधरी, संपूर्ण पर्यावरण शास्त्र

३ https://www.unnep.org

4. https://unacademy com

5. https://andhashr.blogspot.com



P.D. Patil Social Work College
College Code

Scanned with OKEN Scanner

# Exploring Growth of India

## A Multidiminsional Journey

( भारताच्या विकासाची बहुआयामी प्रक्रिया )


: EDITOR :

**Prof. Dr. Balaji G. Kamble**
Principal
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.) India

**Dr. Nilam M. Chhangani**
Head., Dept. of Economics
Shri Kisanlal Nathmal Goenka Arts &
Commerce College, Karanja (Lad),
Dist. Washim (M.S.) India



**Jyotichandra Publication, Latur**



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-980457-9-9

# • Exploring Growth of India : A Multidiminsional Journy

**Editor : Prof. Dr. Balaji G. Kamble**
**Dr. Nilam Chhangani**

**Copyright © Authors 2025**

• **Publisher**
**Jyotichandra Publication**
Gyandev Parvati niwas, LIC Colony
Pragati Nagar, Latur. 8484818000

• **Type Setting :** Vikas Dhamale

• **Cover Page:** Chandrakant B. Kamble

• **Printer :**
Indovision Offset Printing & Binding
LIC Colony, Latur. 8484818000

**First Editon : 15 Aug. 2025**

**Note :** All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or other electronic or mechanical methods, without the written permission of the publisher and the Author.

Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| Sr. No. | Paper | Page no |
|---|---|---|
| 1 | A study on issues and challenges of startups in India - Dr. Avinash Ramkrishna Pawar | 1 |
| 2 | Artificial Intelligence in Sorts - Dr. Ashish Govindrao Barde | 8 |
| 3 | The impact of Artificial Intelligence (AI) on Library Services - Dr. Prakash Shriram Kolhe | 12 |
| 4 | A Study of Personality Development and Sports - Dr. Anjali D.Barde | 17 |
| 5 | Role of Entrepreneurs in Indian Economy - Dr. Sudam Pawar | 21 |
| 6 | Reimagining Tourism : Trends, Challenges and Opportunities - Dr. Nagnath M. Adate | 30 |
| 7 | Idea of Local Self Institutions and Indian Rural Development - Dr Amol Minchekar, Hemlata Minchekar | 34 |
| 8 | Digital India Program and Inclusive Growth : Challenges and Opportunities - Dr. T. S. Bidwe | 39 |
| 9 | Ayushman Bharat and Economic Inclusion : A Study of Health Expenditure Reduction Among Marginalized Groups - Mrs. Hemlata Amol Minchekar | 43 |
| 10 | Advancing Health and Fitness : Insights from Physical Education Research in India - Suresh Mahajanrao Jondhale | 48 |
| 11 | Physical Education and Holistic Development - Dr. Bhupindarsing Arjun Sing | 52 |
| 12 | Biodiversity and Conservation Strategies : Exploring India's Faunal Wealth - Dr. Swati Digambar Yadav | 56 |
| 13 | Zoological Research and Its Role in Sustainable Development - Archana Digambarrao Nagargoje | 61 |
| 14 | भक्तिकालीन महाराष्ट्र का सन्त साहित्य - प्रा. डॉ. शहाजी बाला चव्हाण | 65 |
| 15 | भारतीय संकृती में बौद्ध धम्म कि प्रासंगिकता - प्रा. डॉ राजेश व्ही. चौरपगार | 69 |
| 16 | मुस्लिम महिलाओं की वर्तमान स्थिति - डॉ. जाफर अब्बास चौधरी | 74 |
| 17 | हिंदी साहित्य में महिला साहित्यकारों का योगदान - डॉ. मनीषा जनार्धन नागिले | 79 |
| 18 | हिंदी साहित्य में समाज उत्थान - डॉ. आर.व्ही. पोपळघट | 83 |
| 19 | स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता योजना - रोजगार निर्मितीचे साधन - डॉ. दयाळू राठोड | 86 |
| 20 | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारताचा आर्थिक विकास : नव्या जागतिक व्यवस्थेतील भूमिका - डॉ. आर. बी. भांडवलकर | 90 |


Smt. P.D. Patil Social Work College, AKOLA College Code 225

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 21 | ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या व प्रश्न - **डॉ. दिनेश खेरडे** | 94 |
| 22 | भारतातील पर्यावरण विषयक समस्या आणि उपाय - **डॉ. गजानन संतोषराव कुबडे** | 98 |
| 23 | भारताच्या आर्थिक विकासात कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगीता - **डॉ. नितिन ज्ञानदेव चौधरी** | 105 |
| 24 | जलसंवर्धन आणि जल व्यवस्थापनातील आर्थिक व सामाजिक मर्यादा - **डॉ. हृषिकेश आर. विप्रदास, डॉ. राजेंद्रकुमार गव्हाळे** | 111 |
| 25 | आर्थिक स्वावलंबन आणि आत्मनिर्भर भारत - **डॉ बालाजी जी. कांबळे** | 115 |
| 26 | आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे जागतिक स्थान - **डॉ. अनिल माधव रेड्डी** | 119 |
| 27 | हवामान बदल आणि शाश्वत विकास- एक ज्वलंत समस्या - **डॉ. निलम मधुसूदन छंगाणी** | 123 |
| 28 | डिजिटल अर्थव्यवस्था आणि भारताचा बहुआयामी विकास - **डॉ. मनोजकुमार सोमवंशी** | 130 |
| 29 | युवा पिढी, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन : भारताच्या विकास प्रक्रियेतील योगदान - **डॉ. बळीराम पवार** | 134 |
| 30 | शाश्वत आर्थिक विकास आणि पर्यावरण संवर्धन - **डॉ. गजानन बनचरे** | 138 |
| 31 | महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय संस्कृती : एक अभ्यास - **डॉ. प्रदीप पंजाबराव येवले** | 143 |
| 32 | भारतातील महिला सशक्तीकरणाची प्रक्रिया आणि आव्हाने - **डॉ. दयाश्री विनायकराव कोकाटे** | 147 |
| 33 | ग्रामीण महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण - **प्रा. डॉ. शाम दुतोंडे** | 150 |
| 34 | भारतीय कृषी क्षेत्रातील कामगिरी आणि समस्या - **डॉ. सुजाता नाईक** | 155 |
| 35 | ग्रामीण स्थानिक शासन संस्थेचे बदलते स्वरूप महिलांचा सामाजिक दर्जा - **डॉ. बळवंत पाटील** | 160 |
| 36 | भारतातील शिक्षण आणि रोजगाराची स्थिती : एक अभ्यास - **डॉ. पांडुरंग जगन्नाथ गोटे** | 164 |
| 37 | उद्यमशील भारतातील सामान्य नागरीकाची भागीदारी एक वाटचाल - **श्री. पवन मुकुंदराव माकोडे** | 170 |
| 38 | साहित्य, समाज व संस्कृती : सहसंबंध - **डॉ. सुनिल शिवलाल राठोड** | 174 |
| 39 | साहित्य, समाज व संस्कृती : एक सहसंबंधात्मक अभ्यास - **विवेक कोल्हे, प्रा.डॉ. गजानन घोंगटे** | 178 |
| 40 | भारतातील मध्यमवर्गाचा उपभोग पद्धती व देशांतर्गत मागणीवर होणारा प्रभाव - **प्रा. नम्रता आनंदराव निकम** | 182 |


Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225

Scanned with OKEN Scanner

35

# ग्रामीण स्थानिक शासन संस्थेचे बदलते स्वरूप महिलांचा सामाजिक दर्जा

**डॉ. बळवंत पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी, अकोला

**गोषवारा**

*प्राचीन काळी भारतामध्ये पंचायत व्यवस्था अस्तित्वात होती. पंचायत म्हणजे पाच व्यक्तीचे मिळून वनणारे ग्राममंडळ होय. न्यायदान करणे आणि कर वसुल करणे हे या पंचायतीचे प्रमुख कार्य होते. ब्रिटीग राजवटीमध्ये पंचायत संस्थाचा ऱ्हास झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बलवंतराय मेहता समितीच्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या शिफारशीवर आधारित त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. गावपातळीवर ग्रामपंचायती, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अस्तित्वात आली त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. त्यानंतर पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी एल. एम. सिंगवी यांनी पंचायत राज संस्थाना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली. 73 व्या घटनादुरूस्तीनंतर पंचायत राज संस्थामध्ये परिवर्तन झाले अनुसूचित जाती व जमाती, महिला हे घटक स्थानिक शासन संस्थेमध्ये व निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकले 73 व्या घटना दुरूस्तीमुळे स्थानिक शासन संस्थेचे स्वरूप बदलत गेले. महिलांचा स्थानिक शासन संस्थेमध्ये सहभाग वाढल्यामुळे राजकारणाचे समिकरण बदलत गेलेले दिसुन येते.*

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळी भारतात पंचायत व्यवस्था अस्तित्वात होती. पंचायत म्हणजे पाच व्यक्तीनी मिळून वनणारे ग्राममंडळ होय. पंचायती मधील व्यक्ती हया अनुभवी व प्रतिष्ठीत होत्या न्यायदान करणे आणि कर वसुल करणे हे पंचायतीचे प्रमुख कार्य होते. गावामध्ये पंचायतीला मान होता त्यांचा निर्णय ग्रामीण जनतेला मान्य असे. ब्रिटीश काळामध्ये मात्र पंचायतीचा ऱ्हास झाला. न्यायदानाचे कार्य हे न्यायालयांवर सोपविण्यात आले. कर वसुली साठी स्वतंत्र यंत्रणा नेमण्यात आली. ब्रिटीश काळात लॉर्ड रिपनने पंचायतीची फेरस्थापना करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला फारसे यश आले नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बलवंत राय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची त्रिस्तरीय रचना सुचविली त्यानुसार भारतात पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली त्यानंतर पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी, अशोक मेहता समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी पंचायत राज व्यवस्थेत परिवर्तन व्हावे यासाठी महत्वपूर्ण सुचना केल्या होत्या. एल.एम.सिंघवी समितीने तर पंचायत संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे अशी महत्वाची शिफारस केली. त्यानंतर 73 व्या वर्षे घटना दुरूस्ती झाली. 73 व्या घटना दुरूस्तीमुळे पंचायत संस्थामध्ये परिवर्तन घडून आले. स्थानिक शासन संस्थाना अधिक बळकटी प्राप्त झाली. महिलांचा

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

राजकारणातील सहभाग वाढला इतकेच नाहीतर त्या निर्णय प्रक्रियेमध्ये सामील झाल्या. महत्वाचे विकासाचे निर्णय सक्षमपणे घेऊ लागल्या स्वच्छता, पाणी प्रश्न या समस्या सोडवू लागल्या

**उद्दिष्टये :-**

1. पंचायत संस्थेचा पूर्व इतिहास अभ्यासणे.
2. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची पंचायत राज व्यवस्था अभ्यासणे
3. 73 व्या घटना दुरूस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेमध्ये झालेले बदल अभ्यासणे.

4) माहिलांच्या राजकीय दरजाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम तथ्य सामग्रीवर साधारित आहे. विविध मासिके, वर्तमान पत्रे, इंटरनेट यामधुन माहिती संकलित केली आहे.

**पंचायत राज संस्थेचा पूर्व इतिहास :-**

भारतामध्ये फार प्राचीन काळापासुन पंचायती अस्तित्वात होत्या असे दिसुन येते. मात्र त्यांचे स्वरूप हे आजच्या पंचायतीपेक्षा खूप वेगळे होते. पंचायत म्हणजे पाच व्यक्तींनी मिळून बनवारे ग्राममंडळ होते. गावातील हुशार, अनुभवी आणि आदरणीस अशी पाच मंडळी या पंचायतीमध्ये असत ग्रामस्थांच्या अडचणी समजावून घेणे व त्यांना मार्गदर्शन करणे, गावातील भांडण, तंटे मिटविणे, गावाच्या विकास योजना तयार करणे, कर वसुल करणे अशी महत्वाची कामे ते पार पाडीत असत. त्यांना गावामध्ये मानसन्मान व प्रतिष्ठा असे. मौर्य काळात पंचायतीला ग्रामशासनाचा अधिकार होता. त्या काळातील पंचायती हया खूपच विकसित होत्या. सन 800 ते 1000 च्या दरम्यान बोल घराव्याचा इतिहासातील एकल येथील चौदा शिला खऱ्या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. त्या काळातील ग्रामपंचायती हया आताच्या ग्रामपंचायती सारखीच विकास कामे देखील करित असत. दरवर्षी ग्रामपंचायतींची निवडणूक होत असे व सभासद हे लोकनियुक्त असत. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखदेखीसाठी नेमणूक होत असे. न्यायदान करणे हे प्राचीन पंचायतीचे प्रमुख कार्य असे. त्यांनी दिलेला निर्णय हा गावातील सर्व लोकांना मान्य असे. देवळात नंदादीप लावणे किंवा पंचायतीस काही गाई पुरविणे या गोष्टी शिक्षा म्हणून दिल्या जात असत. फाशीची शिक्षा क्वचितच दिली जात असे.

प्राचीन खेडी ही स्वयंपूर्ण व स्वायत्त होती. भारतामध्ये अनेक साम्राज्ये आली. प्रत्येक राजवटींनी ही पद्धत स्विकारली होती. मोगल साम्राज्याने देखील ही पद्धत स्विकारली होती. मात्र ब्रिटीश राजवटीमध्ये पंचायत राज व्यवस्थेचा ऱ्हास झाला. ब्रिटीशांनी आपल्या स्वार्थासाठी पंचायत व्यवस्था मोळकळीस आणली. पोलिस पाटील पासुन कलेक्टर पर्यंतची व्यवस्था निर्माण केली. न्यायदानासाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन केली आणि प्राचीन पंचायतीचा - हास झाला. 1882 मध्ये लॉर्ड रिपनने पंचायतींची फेरस्थापना करण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोग्य आणि प्राथमिक सोयी सुविधानपुरते तेच त्यांचे कार्य मर्यादीत होते. त्यामुळे त्याला फारसे यश लाभले नाही.

देशाच्या स्वातंर्त्य संग्रामाच्या काळात पुनुरूत्थापनाचा व नवनिर्माणाचा विचार सुरू झाला. महात्मा गांधीनी खेडयांकडे चला हा मुलमंत्र दिला. गावातील तळाच्या घटकांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित केले. त्यांनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अर्थ प्राप्त झाला होता. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर ग्रामस्वराज्याकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. घटना समितीने देखील ग्रामपंचायतीना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास राज्य सरकार आवश्यक अधिकार देतील असे. चाळीसाव्या मार्गदर्शक सुत्रात नमुद केले.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

**स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची पंचायत राज व्यवस्था :-**

भारतामध्ये 2 ऑक्टोबर 1959 मध्ये राजस्थान आणि 1 नोव्हेंबर 1959 मध्ये आंध्रप्रदेश या दोन राज्यामध्ये सर्वप्रथम पंचायत राजव्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रात ही प्रक्रिया उशीरा सुरू झाली 1 मे 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर 1 मे 1962 मध्ये महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. वसंतराव नाईक समितीने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीमध्ये महत्वपूर्ण बदल सुचविले. त्यानुसार महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली.

पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर विविध समित्यांची स्थापना वेळोवेळी करण्यात आली होती. त्यांनी पंचायत राज व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. 1960 मधील श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी समितीने ग्रामसभा स्थापन करण्याची महत्वपूर्ण शिफारस केली होती. 1977 साली अशोक मेहता समितीने राज्याच्या परिस्थितीनुसार पंचायत राज व्यवस्था वेगळी असु शकते त्यामुळे आवश्यकता असल्यास घटनेत दुरूस्तीकरून पंचायत राजद्वारे लोकशाही विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे मत मांडले श्री. जी. व्ही. के. राव यांनी लोकांच्या प्रत्यक्ष सहभागासाठी पंचायत व्यवस्थेला महत्वपूर्ण स्थान असावे अशी शिफारस केली.

महाराष्ट्रामध्ये देखील पंचायत राज व्यवस्था यशस्वी व्हावी यासाठी विविध समित्यांची स्थापना केली. यामध्ये 1986 मध्ये बर्वे समिती, 1970 मध्ये बोगीरवार समिती, 1984 मध्ये पी.बी. पाटील समिती यांचा समावेश होता. या शिफारशींच्या आधारे राज्य शासनाने दुरुस्त्या केल्या आहेत.

**73 व्या घटना दुरूस्तीनंतर पंचायत राज व्यवस्थेमध्ये झालेले परिवर्तन :-**

देशाच्या विकासासाठी पंचायत राज व्यवस्था बळकट करणे व त्यांना स्वायत्त संस्था म्हणून स्थान देण्याचा निर्णय माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घेतला. हयासाठी घटनादुरूस्ती आवश्यक आहे या जाणीवेतुन 64 वी घटना दुरूस्तीचे विधेयक लोकसभेपुढे मांडण्यात आले. लोकसभेत मंजुरी मिळालेल्या या विधेयकाला राज्यसभेत मंजुरी मिळाली नाही त्यानंतर हे विधेयक दुस?यांद सप्टेंबर 1990 मध्ये व्हि. पी. सिंग यांच्या नेतृत्वाआली मांडण्यात आले परंतु या बिलावर चर्चा होण्यापूर्वीच राष्ट्रीय आघाडी सरकार कोसळले व लोकसभा बरआस्त झाली त्यामुळे हे विधेयक मंजुर होऊ शकले नाही. सष्टेंबर 1991 मध्ये पी. व्ही. नरसिंहराव सरकारने हे विधेयक लोकसभेत तिस?यांदा मांडले त्याला 22 डिसेंबर 1992 मध्ये मंजुरी मिळाली. 23 डिसेंबर 1992 रोजी राज्यसभेत हे विधेयक मंजुर झाले. पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देणारे हे विधेयक अस्तित्वात आले. राष्ट्रपतींनी 20 एप्रिल 1993 मध्ये या दुरूस्तीला मान्यता दिली. भारतामध्ये 24 एप्रिल 1993 या घटनादुरूस्तीची अंमलबजावणी सुरु झाली. राज्य सरकारला पंचायत राज व्यवस्था सुरू करण्यासाठी कायदे करण्यास सुचना दिली.

73 व्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेत पंचायत या शिर्षकाखाली भार 9 अ आणि कलम 243 व 11 ते परिशिष्ट जोडण्यात आले. या घटनादुरुस्तीमुळे प्रत्येक राज्यात पंचायत राज व्यवस्था स्थापन करण्याचे बंधन घातले आहे. पंचायत राजसंस्थांना त्यामुळे घटनात्मक दर्जा प्राप्त झाल्या आहे. राज्यसरकार पंचायत राज संस्थामध्ये हस्तक्षेप आणि मनमानी करू शकत नाही. पंचायत संस्थांना यावूर्वी मुदतवाढ मिळत असल्यामुळे नियमीतपणे निवडणुका होत नसत. परंतु घटना दुरूस्तीमुळे निवडणुका बंधन आल्यामुळे निवडणुका घेण्यात येऊ लागल्या.

महिलांना सदस्यत्वाबरोबरच अधिकार पदांमध्ये आरक्षण प्राप्त झाले. अनुसुचित जाती व जमातीना त्यांच्या लोकसंस्थेच्या प्रमाणात राखीव जागा मिळाल्या त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना पंचायत राजमध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या क्षेत्रात सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात निर्णय घेण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे अधिकार प्राप्त झाले.

R.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

गावाच्या कारभारात लोकांचा सहभाग वाढावा या हेतूने ग्रामसभेचे आयोजन करणे हे ग्रामपंचायतीवर बंधनकारक केले आहे. ग्रामपंचायतीचे मतदार हे ग्रामसभेचे सदस्य असल्यामुळे त्यांना ग्रांमसभेच्या बैठकांना उपस्थित राहणे आणि विकासासंबंधी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. वर्षातुन किमान सहा ग्रामसभा होणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. घटनादुरूस्तीमुळे ग्रामसभांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

**ग्रामीण महिलांचा राजकिय दर्जा :-**

73 व्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण हे सभासदत्वाबरोबरच अधिकार पदामध्ये ठेवले. त्यामुळे ग्रामीण महिला हया राजकारणात सहभागी होऊ शकल्या. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी" - या उक्तीप्रमाणे ही संकल्पना ठरविण्यात आली. संसाराचा गाडा ज्याच प्रमाणे त्या महिला कार्यक्षमपणे हाकतात त्याचप्रमाणे त्या पंचायतीचा कारभार देखील सक्षमपणे कार्यक्षमतेने करतील हा विश्वास महिलांवर 73 व्या घटना दुरूस्तीद्वारे ठेवण्यात आला आणि महिला देखील सक्षमपणे व स्थानिक संस्थामध्ये सहभागी झाल्या. महिला आरक्षण हे तेहतीस राजकरणांची दोरीती जगाची उद्घारी टक्यांवरून पन्नास टक्के झाले. महिलांचा राजकारणातील प्रवेश हा महत्वाचा ठरू लागला. राजकिय, सामाजिक, आर्थिक आणि कौटुबिंक स्तरावर स्त्री म्हणून तिला आत्मभान येऊ लागले. सुरूवातीला फक्त माहित असणारे, मग मिळालेले आणि नंतर तिने मात्मसात केलेले अनेक अधिकार स्त्रीयांनी राबवायला सुरूवात केली. 73 व्या घटना दुरूस्तीनंतर ग्रामीण पातळीवर खऱ्या अर्थाने स्त्री नेतृत्व निर्माण होऊ लागले.

महिला राजकारणात सक्रिय झाल्यानंतर पाणी समस्या, स्वच्छता या समस्यांना प्राधान्य देऊ लागल्या. "चुल आणि मुल" या पारंपारिक चौकटीबाहेर जाऊन विकासाचे निर्णय सक्षमपणे घेऊ लागल्या ग्रामीण महिलांचे नेतृत्वांचे वय सरासरी तरूण असलेले दिसुन येते. 20 ते 40 वयोगटातील महिला राजकारणात सक्रिय दिसुन येतात तसेच दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या महिला हया राजकारणात सहभागी होऊ लागल्या आहेत. विशेष म्हणजे आर्थिक सत्ता नसताना देखील महिला सत्ताकेंद्रात सहभागी होत आहेत. राजकिय सहभागामुळे त्यांचा आत्मविश्वास द्विगुणीत झाला आहे. कोणतीही राजकिय पार्श्वभूमी नसताना महिला कौटूंबिक जबाबदारी सांभाळून राजकारणात सहभागी होत आहेत ग्रामीण महिलांना राजकारणात काम करताना अनेक अडचणी येत असल्यातरी त्या सक्षमपणे त्या अडचणीचा सामना करीत पुढे जात असलेल्या दिसुन येतात.

**निष्कर्ष :-**

प्राचीन पंचायती पासुन आधुनिक पंचायत राज व्यवस्थेपर्यंतची पंचायत संस्थांची वाटचाल ही वैशिष्टयपूर्ण दिसून येते. स्थानिक शासन संस्थेचे स्वरूप हे 73 व्या घटनादुरूस्तीने बदलेले दिसते. कुणाच्याही खिजगणतीत नसणाऱ्या आणि निर्णय प्रक्रियेत कोणतेही स्थान नसणाऱ्या महिला आरक्षणामुळे सत्तेच्या प्रकाश झोतात आल्या. कायमची दुय्यम स्थान असणारी आणि राजकारण हे पुरूषांचेच काम मानणारी स्त्री ग्रामीण राजकारणात सक्रिय झ ाली. आणि विकास कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेऊ लागली. त्यामुळे तिचा राजकियदर्जा गुंतवलेला दिसून येतो.

## संदर्भ सूची


1. किशोर लवटे - पंचायतराज, ज्ञानदिप ॲकेडमी.
2. पंचायत राज भगीरथ प्रकाशन पुणे.
3. mn.vikaspedia.in
4. https://www.loksatta.com


P.D. Patil Social Work College College Code 225

Scanned with OKEN Scanner

15 August 2025

# Exploring Growth of India

## A Multidiminsional Journy

( भारताच्या विकासाची बहुआयामी प्रक्रिया )

: EDITOR :

**Prof. Dr. Balaji G. Kamble**
Principal
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.) India

**Dr. Nilam M. Chhangani**
Head., Dept. of Economics
Shri Kisanlal Nathmal Goenka Arts &
Commerce College, Karanja (Lad),
Dist. Washim (M.S.) India

**Jyotichandra Publication, Latur**

2/249

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

ISBN : 978-81-980457-9-9



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 41 | पंचायत राज आणि ग्रामीण नेतृत्वाचा विकास - प्रा. विनोद जे. राठोड | 190 |
| 42 | भारतातील महिला सशक्तीकरणात बचत गटाची भूमिका - प्रा. डॉ. सुरेश अंबादास कातळे | 194 |
| 43 | डिजिटल शिक्षण आणि ग्रामीण भागातील आव्हाने - डॉ. अर्चना नारायण धर्मे | 198 |
| 44 | नवीन शैक्षणिक धोरण नवदृष्टीकोन-२०२० मध्ये ग्रंथालयाचा नवदृष्टीकोन - प्रा.वैशाली तुकाराम गोरे | 201 |
| 45 | भारतीय उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील योगदान - डॉ. विष्णू बळीराम पवार | 205 |
| 46 | ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदल आणि परिणाम - डॉ. संदिप नामदेव शिंदे | 210 |
| 47 | शाश्वत विकास - डॉ. देवशाला शिवाजी नागदे | 213 |
| 48 | विकास व पर्यावरण - प्रा. डॉ. रविंद्र दा. इचे | 218 |
| 49 | पर्यावरण, ऊर्जा व शाश्वतता : एक शाश्वत भविष्याची दिशा - सौ. गौरी राजेंद्रकुमार शिंदे | 222 |
| 50 | मानव विकास : बहुआयामी विकास संकल्पना - प्रा. प्रकाश नामदेव शिंदे | 224 |
| 51 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि आधुनिक राष्ट्रनिर्मिती - डॉ. शिवाजी गाढे | 229 |
| 52 | भारतीय संविधान निर्मिती आणि आधुनिक राष्ट्र राज्याचा उदय - प्रा. एस. डी. मुळे | 233 |
| 53 | भारताच्या सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक बदलांचे आधुनिक समाजावर प्रभाव - डॉ. अशोक गंगाराम साबणे | 236 |
| 54 | भारताची लोकसंख्या वसाहतीची भौगोलिक रचना आणि विकासाची दिशा - डॉ. कोंडीबा रामराव कांदे | 240 |



Smt. P.D. Patil Social Work College ☆ Khadki, AKOLA ☆ College Code 225

Scanned with OKEN Scanner

43

# डिजिटल शिक्षण आणि ग्रामीण भागातील आव्हाने

डॉ. अर्चना नारायण धर्मे
स प्राध्यापक,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला
archanamahajan57@gmail.com

**प्रस्तावना:**

डिजिटल शिक्षण ही आधुनिक काळातील शिक्षणाची एक क्रांतिकारी संकल्पना ठरली आहे. इंटरनेट, संगणक, मोबाइल ॲप्स, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स अशा विविध माध्यमांच्या सहाय्याने शिक्षणप्रक्रिया अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि प्रभावी झाली आहे. कोरोना महामारीनंतर जगभरात, विशेषतः भारतात, डिजिटल शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. लॉकडाऊनच्या काळात शाळा बंद असताना ऑनलाइन शिक्षण हे एकमेव पर्याय ठरले. परंतु, हा अनुभव शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये खूपच वेगळा होता. शहरी भागात जिथे साधने आणि सेवा सहज उपलब्ध होत्या, तिथे शिक्षण सुरळीतपणे चालू राहिले; परंतु ग्रामीण भागात ही प्रक्रिया अडथळ्यांची ठरली. ग्रामीण भारतातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सर्वांनी अनेक आव्हानांचा सामना केला. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचे फायदे असले तरी ग्रामीण भागासाठी ही प्रक्रिया अजूनही अनेक पातळ्यांवर संघर्षात्मक आहे.

डिजिटल शिक्षण म्हणजे संगणक, मोबाइल फोन, इंटरनेट, शिक्षणपर ॲप्लिकेशन्स, व्हिडीओ लेक्चर्स आणि व्हर्च्युअल क्लासरूमच्या माध्यमातून दिले जाणारे शिक्षण होय. हे शिक्षण पारंपरिक शिक्षणाच्या मर्यादा ओलांडून विद्यार्थ्यांना अधिक संवादात्मक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि विविधतापूर्ण शिक्षण देऊ शकते. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि ज्ञानप्रक्रिया अधिक प्रभावी बनते. तथापि, ग्रामीण भागात अद्यापही डिजिटल शिक्षण स्वीकारण्यासाठी अनेक अडथळे आहेत.

ग्रामीण भारतामध्ये 60% हून अधिक लोकसंख्या राहते. परंतु, या भागात इंटरनेट प्रवेश, डिजिटल साक्षरता, आर्थिक परिस्थिती, सामाजिक मानसिकता, विद्युत पुरवठा इत्यादी अनेक अडचणी आहेत. बहुतेक वेळा या भागातील विद्यार्थी स्मार्टफोन किंवा संगणक वापरण्यात अपयशी ठरतात कारण त्यांच्या घरी ती साधनेच उपलब्ध नसतात. काही ठिकाणी स्मार्टफोन असला तरी डेटा रिचार्ज करणे शक्य नसते. इंटरनेट स्पीड कमी असतो किंवा सतत खंडित होतो. त्यामुळे शिक्षकांनी घेतलेले ऑनलाइन वर्ग वेळेवर ऐकणे अथवा समजून घेणे कठीण जाते.

याशिवाय शिक्षकांचीही डिजिटल साक्षरता एक मोठा प्रश्न आहे. अनेक शिक्षक पारंपरिक शिक्षणपद्धतीशी जास्त परिचित आहेत आणि तांत्रिक शिक्षणाचे कौशल्य फार कमी आहे. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी त्यांना प्रशिक्षण आवश्यक असते. अनेकवेळा शासनाकडून प्रशिक्षण देण्यात येते पण त्याचे स्वरूप सरधोपट असल्यामुळे सर्व शिक्षकांना आवश्यक कौशल्य प्राप्त होत नाही. परिणामी, शिक्षणाचा दर्जा प्रभावित होतो.

P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

**अभ्यासाचे उद्दिष्ट:**

1) ग्रामीण भागात डिजिटल शिक्षणाची सध्याची स्थिती मोजणे
2) मुख्य अडचणीची ओळख
3) विद्यमान संशोधन व योजनांचा आढावा
4) सुधारात्मक उपायांचा प्रस्ताव.

**डिजिटल शिक्षणाची गरज ग्रामीण भागात**

1) शिक्षणाच्या संधीचा अभाव.
2) पुरेसे शिक्षक उपलब्ध नसणे.
3) शाळांची व शिक्षण संस्थांची कमतरता.
4) विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळवून देण्यासाठी डिजिटल शिक्षण अत्यावश्यक.

**डिजिटल शिक्षणाचे फायदे**

1) सुलभ प्रवेश: इंटरनेट आणि मोबाइलद्वारे घरबसल्या शिक्षण घेता येते.
2) दूरध्वनी शिक्षण (Distance Learning): वेळ व ठिकाणाचे बंधन नाही.
3) स्वतंत्र अभ्यास: विद्यार्थ्यांना त्यांचा वेग आणि आवडीनुसार शिकण्याची संधी.
4) अद्ययावत माहिती: जगभरातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध.

**डिजिटल साधने (Tools) ग्रामीण शिक्षणासाठी**

1) मोबाईल ॲप्स: DIKSHA, ePathshala, Byju's, Khan Academy इ.
2) ऑनलाइन शाळा/कोर्सेस: SWAYAM, NPTEL, Coursera.
3) स्मार्ट क्लासरूम: शाळांमध्ये प्रोजेक्टर, स्मार्ट बोर्ड.
4) टीव्ही व रेडिओ शिक्षण: PM eVidya, Radio Shiksha Vani.

**डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण विकास कसा साधतो?**

1) मानवी संसाधन विकास: शिक्षणामुळे कुशलता वाढते.
2) स्वरोजगार व उद्योग: डिजिटल कौशल्ये मिळाल्याने युवक उद्योजक बनतात.
3) महिला सबलीकरण: महिलांना घरबसल्या शिक्षण घेऊन आर्थिक स्वावलंबन.
4) आरोग्य, शेती व इतर क्षेत्रातील जागरूकता: विविध डिजिटल प्रशिक्षणामुळे सुधारणा.
5) शासकीय योजना समजून घेता येणे: पोर्टल्स व ॲप्सच्या साहाय्याने.

**अडचणी व मर्यादा**

1) इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव.
2) वीज पुरवठ्यातील अस्थिरता.
3) डिव्हाइसची (मोबाईल/लॅपटॉप) कमतरता.
4) तांत्रिक ज्ञानाची उणीव.
5) भाषेचे अडथळे - इंग्रजी ज्ञानाचे अभाव.

Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225

ग्रामीण भागातील पालकांची मानसिकताही एक अडथळा ठरू शकते. अनेक पालकांना डिजिटल शिक्षणाचे महत्त्व पटत नाही. त्यांना वाटते की मुलं मोबाइलवर शिक्षणाऐवजी खेळ किंवा मनोरंजन करतात. त्यामुळे ते त्यांना फोन देण्यास तयार नसतात. शिवाय, एकाच घरी एकच मोबाइल असतो जो बहुधा पालकांच्या कामासाठी

रला जातो. त्यामुळे शिक्षणासाठी त्याचा वापर होणे कठीण होते. काही वेळा घरात वीज नसते किंवा इंटरनेट र्क खूपच दुर्बळ असते. ही सर्व परिस्थिती विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण करते.

शासनाने डिजिटल शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. "डीजी शिक्षण", "दीक्षा ", "स्वयं पोर्टल", "ई-पाठशाळा", "विद्या प्रवेश" इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. काही राज्य कारांनी आपापल्या स्तरावर शैक्षणिक टिव्ही चॅनेल्स सुरू केले आहेत. परंतु, या योजनांचा प्रभाव ग्रामीण भागात च मर्यादित राहिला आहे. कारण तेथील मूलभूत समस्या आधी सोडवणं अधिक गरजेचं आहे.

अशा अनेक अडचणी असूनही काही ग्रामीण भागांमध्ये डिजिटल शिक्षण यशस्वीपणे राबवले गेले आहे. ही स्वयंसेवी संस्था, समाजसेवक, स्थानिक शिक्षक आणि तंत्रज्ञानात गती असलेल्या युवकांनी आपापल्या तळीवर प्रयत्न करून विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचवले आहे. मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून संगणक प्रशिक्षण, डीओ लेक्चर्सचे प्रोजेक्शन, गटाने शिक्षण देणे अशा पद्धती वापरून काही गावे डिजिटल शिक्षणात प्रगत झाली हेत. या उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की योग्य नियोजन, संसाधन आणि जनसहभाग यांचा समन्वय साधल्यास जिटल शिक्षण ग्रामीण भागातही प्रभावीपणे राबवता येऊ शकते.

भविष्यात डिजिटल शिक्षण अधिक प्रभावीपणे राबवायचे असल्यास काही मूलभूत सुधारणा आवश्यक हेत. सर्वप्रथम, ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा आणि वीजपुरवठा सुरळीत असणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र णि राज्य शासनाने पायाभूत सुविधा सुधारण्यावर लक्ष केंद्रित करावे. दुसरे म्हणजे, प्रत्येक शाळेत डिजिटल क्षणासाठी आवश्यक साधनसामग्री - जसे की स्मार्ट टीव्ही, प्रोजेक्टर, टॅबलेट्स इत्यादी उपलब्ध करून दिली हिजे. तिसरे, शिक्षकांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांना डिजिटल माध्यमांमध्ये पारंगत करणे गरजेचे आहे. शिवाय, विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण दिल्यास ते अधिक आत्मविश्वासाने शिक्षणात भाग घेऊ कतील.

शेवटी, ग्रामीण भागातील समाजाची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. डिजिटल शिक्षण ही फक्त हरी विद्यार्थ्यांची मक्तेदारी नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याचा हक्क आहे, ही जाणीव समाजात निर्माण करणे गरजेचे हे. यासाठी जनजागृती मोहिमा राबवणे, यशोगाथा शेअर करणे, स्थानिक नेतृत्वाचा वापर करणे यासारखे उपाय पयुक्त ठरतील.

डिजिटल शिक्षण हे ग्रामीण भारतासाठी केवळ एक शिक्षणपद्धती नाही तर एक संधी आहे - सामाजिक रिवर्तनाची, समानतेची आणि ज्ञानसंपन्न भविष्यातील उभारणीची. ही संधी अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी र्व घटकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. शासन, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी ह्या ऱ्यांनी आपापली जबाबदारी पार पाडल्यास, ग्रामीण भारतातील शिक्षण क्षेत्रात एक नवी क्रांती घडू शकते.

डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाच्या वाटा खुल्या होत आहेत. परंतु त्या वाटांवर अडथळे दूर करून ोग्य मार्गदर्शन, संसाधने आणि जाणीव मिळाल्यासच ही प्रक्रिया यशस्वी होईल. ग्रामीण भागातील आव्हानांची खल घेऊन ठोस पावले उचलल्यास, भारत खऱ्या अर्थाने डिजिटल शिक्षण क्षेत्रात पुढे जाऊ शकतो.

Smt. P.D. Patil Social Work College College Code 225 Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

Volume - 1 ISBN No. : 978-93-6186-955-6

ONE DAY NATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE
ON

# INDIAN CONSTITUTION & HUMAN RIGHTS (VALUES & RELEVANCE)

Date : Saturday, 20th Sept. - 2025

## CONFERENCE PROCEEDINGS

*- EDITORS -*

*Dr. Sandip B. Kale*

*Prof. Archana D. Barange*

*Organized by*

**DR. B. L. BHOLE VICHAR MANCH, NAGPUR**

IN COLLABORATION WITH

Yeshwant Rural Education Society's

**YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO, DIST. WARDHA**

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE & SOCIOLOGY

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

# Index


1. महिला मानवाधिकाराची वर्तमान दशा व दिशा ........................ ११
   – प्रा. डॉ. अनिल आय. थूल
2. मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून विस्थापित लोकांचे पुनर्वसन : एक अध्ययन ........................ १४
   – सहा. प्रा. दिपक आटे
3. मानवी हक्क आणि आव्हाने........................ १७
   – प्रा. डॉ. लालचंद किसन रामटेके
4. विनायक दामोदर सावरकर आणि हिंदूराष्ट्र संकल्पना........................ २०
   – प्रो. डॉ. अनंत मदन आवटी
   – विजय समाधान चांदणे
5. मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरण यांचा सहसंबंध एक विश्लेषणात्मक अध्ययन ........................ २३
   – सहा. प्राध्या. पवन महंत
6. माहितीचा अधिकार आणि आदिवासी मुलांचे अधिकार........................ २६
   – डॉ. राजू पा. लिपटे
7. सांविधानिक व मानवी मुल्यांचे भारताच्या संदर्भात मुल्यांकन ........................ २९
   – प्रा. डॉ. सरला मेश्राम
8. भारतीय निवडणूक प्रक्रिया ........................ ३२
   – प्रा. विजय शामराव कांडलकर
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आरक्षणासंबंधी धोरण व अंमलबजावणी: एक विश्लेषण ........................ ३५
   – विठ्ठल सुधाकर मेटांगे
10. भारतीय संविधान: महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्क........................ ३९
    – डॉ गणेश आत्माराम पोटे
11. सामाजिक मुल्ये आणि संविधानातील मानवी हक्क: एक विश्लेषण ........................ ४३
    – प्रा. अर्चना बारंगे
12. भारतीय संविधान: महिला आणि बालकांचे मानवी हक्क........................ ४६
    – डॉ. रामेश्वर एस. व्हंडकर
13. आधार संदर्भात भारतीय शासनाची भूमिका........................ ५०
    – डॉ. संदीप भिमराव काळे
14. भारतीय लोकशाहीत निर्वाचन आयोगाची भूमिका........................ ५४
    – प्रा. डॉ. रमेश टिकाराम बागडे
15. भारतीय संविधानातील आर्थिक कायदे आणि मानवी हक्कांचा अभ्यास........................ ५९
    – सहा.प्रा. विजय प्रकाश बोबे
16. भारतीय संविधान : मानवी हक्क आणि घरगुती हिंसाचार कायदा – २००५ ........................ ६३
    – डॉ. क्षमा चव्हाण
17. भारतीय लोकशाहीमध्ये निवडणूक आयोगाची भूमिका........................ ६६
    – सुचित सुकदेव कर्पे


Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA — College Code 225



Scanned with OKEN Scanner

18. महिलाओं का संवैधानिक अधिकार ....................
- डॉ. भालेराव जी. पी.

19. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेमधील महिलांचा सहभाग ....................
- प्रा.डॉ. बाळासाहेबजी.जोगदंड
- कु. दिपीका समाधान तायडे

20. मालमत्तेचा आणि मानवी हक्काचा अधिकार ....................
- प्रा.डॉ.जोगदंड मकरंद बळीराम

21. आर्थिक कायदा – भारतीय राज्यघटना व मानवाधिकार ....................
- डॉ. मनोहर नारायण मोरे

22. निवडणूक आयोगाची भूमिका व आव्हाने ....................
- डॉ. विकास बी. चांदजकर

23. मानवाधिकार के बदलते प्रतिमान: एक विश्लेषण ....................
- डॉ.राजेंद्रप्रसाद टि. पटले

24. परिसंस्थेची मुलभूत तत्वे ....................
- प्रा. डॉ. रमेश मोतीराम बावनकुळे

25. भारतीय संविधान आणि मानवी हक्क चळवळ....................
- प्रा. डॉ. प्रेमसिंग प्रल्हाद जाधव

26. राष्ट्रसंताच्या ग्रामगीता या ग्रंथातील जीवनमूल्य आणि विचारमूल्य ....................
- कु. संगीता रामदासजी खोडे
- डॉ. सीमा गौरव देशमुख

27. **Economic Law and Human Rights in Indian Commerce: A Constitutional Perspective** ....................
- *Dr. Vivek V. Patil*


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

# भारतीय संविधान आणि मानवी हक्क चळवळ

प्रा. डॉ. प्रेमसिंग प्रल्हाद जाधव
सहाय्यक प्राध्यापक
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी, जि.अकोला

**प्रस्तावना :**

व्यक्ती व शासन यांच्यातील संबंध मानवाधिकाराचे स्वरूप व आशय या संदर्भातून निश्चित होत असतात. शासनाचा प्रकार कोणता आहे यावर मानवाधिकाराचे संरक्षण अवलंबून आहे. लोकशाही शासन मानवाधिकाराचे जास्त प्रमाणात संरक्षण करते. शासनाच्या अनेक उपयुक्त कार्यापैकी मानवाधिकार प्रस्थापित करणे हे एक महत्वाचे कार्य होय. सर हेरसच लाऊटरपेच या प्रसिध्द मानवाधिकार समर्थकाने आधुनिक राज्यांची कार्ये सांगताना म्हटले आहे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्याचा अंतिम उद्देश हा मानवी व्यक्तित्व व त्याचा मुलभूत अधिकाराचे रक्षण करणे होय. त्याचबरोबर अदाई स्टेव्हेनसन यांनी म्हटले आहे, 'आपण जे करतो व करण्याचा प्रयत्न करतो त्याचा गाभा मानावधिकार हा होय.'

सर्वसामान्यतः बोलायचे झाल्यास मानवाधिकार किंवा हक्क हे मुलभूत व अदेय अधिकार होत, जे प्रत्येक मानवमात्राच्या जिवीतासाठी आवश्यक असतात. हे अधिकार समाजाशी निगडीत असतात. ते व्यक्तिवाद, विवेकवाद, वैष्किकता, सहिष्णुता हि मुल्ये स्वीकारतात व विशिष्टता, समुहवाद व रुढीवाढ नाकारतात. थोडक्यात, मानवाधिकार व्यक्तिगत, विवेकाधिष्ठित, वैश्विक व निरपेक्ष अधिकार होत. दुसऱ्या बाजूस अधिकार म्हणजे एक सामाजिक, संस्थात्मक व राज्याचे व आंतराष्ट्रीय समुदायाच्या दृष्टीने मुल्य आहे, ते मुल्य काही उत्तरदायित्व बजावल्यामुळे किंवा कर्तव्य केल्यामुळे प्रस्थापित होते. अर्मत्य सेन यांनी अधिकार म्हणजे अधिकृत पात्रता होय, ती कर्तव्याला जोडून असते असे म्हटले आहे. अधिकारास मानवाधिकार म्हणणे अधिकारांचा सार्वत्रिकतेच्या दृष्टीकोनातून सर्व ठिकाणी विनियोग किंवा उपयोग करणे होय. शिवाय या अधिकाराचा उपयोग करण्यासाठी प्रमाणभूत आदर्श नियामावली, राज्य व बिगरराजकीय घटकांमार्फत तयार करण्यात येते. मानवाधिकार, जगातील प्रत्येक व्यक्तीचे एक माणूस म्हणून (Virtue of Being Human) जगण्याचे अधिकार महत्वाचे आहेत. या अधिकारांचे वैशिष्ट म्हणजे ते सर्व व्यक्तींना समान दिले जातात. दुसरे वैशिष्टय म्हणजे ते अदेय आहेत. ते अधिकार परत घेता येत नाहीत. तिसरे असे की, मानवाधिकार वैश्विक आहेत. याचाच अर्थ असा आहे की, सर्व मानवांचे अधिकार होत.

मानवाधिकार या संकल्पनेचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, बरेचशे युक्तीवाद, या संकल्पनेचा अर्थ व स्वरूपा संदर्भात पुढे येत आहेत. या संकल्पनेवरचे टिकास्त्र सुध्दा पुढे येत आहे. अलिसडेर मॅकइट्रेने मानवाधिकारास जेरमी बेंथाम यांच्या उपयुक्तावादाचे षडयंत्र असे म्हटले आहे तर रिचर्ड रोट्री यांनी मानवाधिकार हा भावनात्मक कल्पनाविलास असून तो विवेकवाद नाही अशी खरपुस टिका केली आहे.

प्रस्तुत शोध निबंधात एकणूच प्रचलित स्थितीत मानवाधिकाराचा मान्यताप्राप्त अर्थ व स्वरूपाच्या चौकटीतून मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणेची (१९४८), भारतातील मानवाधिकार चळवळीची व त्या अनुषंगाने जे विविध प्रश्न निर्माण होत आहेत त्याची चर्चा करायची आहे.

**मानवाधिकाराचा विकास :**

अधिकार व कर्तव्य या संकल्पना राज्याएवढ्याच जुन्या आहेत. याचा उगम प्राचीन ग्रीक व रोमन, कनफ्यूशियन चीन व भारतीय प्राचीन पंचायत पध्दतीमधे दिसतो. खऱ्या अर्थाने मानवी स्वांतत्र्याची व अशा अधिकाराची हमी शासन विषयक नवीन तत्वज्ञानातून १७ व्या व १८ व्या शतकात लेखी स्वरूपात लोकांना मिळालेली आहे. मानवी प्रतिष्ठा व अधिकार हा विषय १८ व्या शतकात राजकीय तत्त्वज्ञानाचा महत्वाचा विषय होता. हा विषय काही ऐतिहासिक दस्तऐवजातून कृतित उतरला आहे. उदाहरणार्थ, अधिकाराची व्हर्जिनिया घोषणा १७७६, अमेरिकेच्या स्वांतंत्र्याची घोषणा १७७६, मानव व नागरिकांची फ्रेंच घोषणा १७८९. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे एकानंतर एक अशा दुरूस्त्या अमेरिकेच्या राज्यघटनेत हक्कासंबंधी जोडल्या गेल्या. त्यास बिल ऑफ राईटस (१७९१) असे म्हणतात. अमेरिकेच्या राज्यघटनेतील हे बिल मानवाधिकाराच्या संरक्षणाचा आदर्श नमुना समजला जातो. या आधारावरच जगातील अनेक देशांनी त्यांच्या राज्यघटनेत हे अधिकार समाविष्ठ केले आहेत. उदाहरणार्थ, बेल्जियम राज्यघटनेने १८३१ मध्ये, इटालियन राज्यघटनेने १८४८ मध्ये, पॅनिश राज्यघटनेने १८६६ मध्ये, ऑस्ट्रिया राज्यघटनेमध्ये १८६७ मध्ये हे अधिकार समाविष्ठ केले आहेत. अमेरिका, फ्रान्स व ब्रिटन यांनी नागरी व राजकीय अधिकार दस्तऐवजातून स्विकारले आहेत. तेव्हा सोव्हिएत रशियाने १९१७ मध्ये सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अधिकार स्वीकारून मानवाधिकाराची नवी संकल्पना निर्माण केली आह. या संकल्पनेस पाश्यिमात्य जग मान्यता देत नाही, हि वस्तूस्थिती होय.

मानवाधिकाराच्या संकल्पनेचा उगम व विकासाचे अनेक टप्पे आहेत. या टप्प्यांतूनच व्यक्तींच्या इच्छा व आंकाक्षांना आकार देण्याचा प्रयत्न झालेला आहे. मानवाधिकाराची प्रस्थापना करून अज्ञान, परंपरा, अंधश्रध्दा या सर्व जोखंडातून व्यक्तींना मुक्त करण्याचा प्रयत्न केला गेला आहे आहे. मानवाधिकाराचा इतिहास हा लोकांचा स्वातंत्र्य व



Scanned with OKEN Scanner

मुलभूत अधिकारप्राप्तीचा संघर्ष आहे. त्यामुळेच इंग्लडमधील मॅग्राकार्टा १२१५, व बील ऑफ राईटस् १६८८, फ्रान्समधील घोषणा १७८९ व बिल ऑफ राईट्स इन युनायटेड १७९१ या ऐतिहासिक घटना त्याचे प्रमुख टप्पे आहेत.

**मानवाधिकाराची वैश्विक घोषणा (१९४८)**

दुसऱ्या महायुध्दातून झालेला विध्वंस, नाझी जर्मनीतील मानवसंहार यातून जगातील राष्ट्रांनी मोठा धडा घेतलेला आहे. सर्व राष्ट्रांनी म्हणूनच पुन्हा एकदा आंतराष्ट्रीय संघटनेची स्थापना करून शांतता व सुरक्षेचे प्रतिपादन केले. त्यातूनच परिपाक म्हणजे २६ जुन १९४५ रोजी जागतिक स्तरावर मानवाधिकार व मूलभूत स्वांतत्र्य याचे संवर्धन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांना सनदेवर सदस्य राष्ट्रांनी स्वाक्षरी केली.

अधिकाराचे आंतरराष्ट्रीय विधेयक तयार करण्याची कल्पना संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेनंतर आरंभीच्या काळापासून विचाराधीन होती. पण जेव्हा इकॉनॉमिक अॅण्ड सोशल कॉन्सिलने एक मानवाधिकार आयोगाची स्थापना केली व त्याकडे विधेयक मांडणीसाठी प्राथमिक तयारीचे काम सोपवले तेव्हा हा विचार पुढे सरकला. या आयोगाने राष्ट्रीय सार्वभौमत्त्व, व्यक्तिगत हितसंबध विरूध्द सामुहिक हितसंबंध यातील संघर्ष हे मानवाधिकाराच्या संकल्पना बांधणीत विचारात घेतले होते. हे विधेयक मुख्यतः तीन भागात विभाजीत केले आहे. पहिल्या भागात, दुसऱ्या भागात, आंतराष्ट्रीय करारनामे मांडण्यात येवून सदस्य राष्ट्रांनी त्यावर स्वाक्षऱ्या करणे अपेक्षित आहे. अणि तिसरा व शेवटचा भाग म्हणजे मानवाधिकारांच्या अंमलबजावणीसाठी सुचवण्यात आलेली यंत्रया होय.

वरील तीन व अनेक अनुषंगिक मुद्यावर आमसभेच्या थर्ड कमिटी ऑन सोशल, ह्युमॅनेटरियन अॅण्ड कल्चरल अफेअर्स समितीने १०० च्या वर बैठका घेऊन सांगोपांग विचार केला. अनेक बैठकांतील चर्चे अंती आमसभेने वैश्विक मानवाधिकार घोषणापत्र (UDHR) १० डिसेंबर १९४८ रोजी स्वीकृत केले आहे.

मानवाधिकाराच्या विकासातील ही घोषणा हे एक फार मोठे ऐतिहासिक पाऊल समजले जाते. या घोषणेला अनेक पैलू आहेत. त्यापैकी तत्वज्ञानात्मक पैलू महत्वाचा समजला जातो. ज्याच्या घोषणचे स्वरूप स्पष्ट करण्यास उपयोग होतो. फ्रीमॅन या अभ्यासकाने मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणेचा अभ्यास करताना असे स्पष्ट केले की, संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांची धार्मिक, राजकीय व वैचारिक विविधता लक्षात घेवून मानवाधिकार आयोगाने कोणत्याही एका विशिष्ट अशा विचाराचा पुरस्कार केला नाही. फक्त एक तात्विक दृष्टीकोन या आयोगाने स्वीकारला, तो म्हणजे नाझी विचारांचा विरोध करणे हा होय. नैसर्गिक अधिकाराला पर्याय म्हणून मानवाधिकार स्वीकारून तात्विक संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाधिकार ही व्यापक तत्वज्ञानात्मक भुमिकांना समर्थ पर्याय देणारी व एक माणूस म्हणून नैतिक समता जपणारी संकल्पना आहे. म्हणूनच जागतिक मानवाधिकार घोषणापत्र फक्त नैसर्गिक अधिकारापुरते मर्यादित न राहता ते व्यापक तत्वज्ञान मांडणारे आहे.

या घोषणापत्राच्या काही मर्यादा देखील विसरता येणारी नाहीत. त्यापैकी एक मर्यादा अशी सांगितली जाते की, ते पाश्चिमात्य पुर्वग्रहावर अवलंबून आहे. कारण पाश्चिमात्य उदारमतवाद हा व्यक्तीकेंद्रीत असून समुहाकडे दुलर्क्ष करणारा आहे. तसेच तो कर्तव्यापेक्षा महत्वाचे आहेत, असे प्रतिपादन करणारा आहे. दुसरा युक्तीवाद अलीकडे आशियाई राष्ट्रमध्ये मांडला जात आहे की, मानवाधिकाराची वैश्विकता एक परिभाषा बहुविधता अस्तित्वात असणाऱ्या विश्वात कशी करता येईल? कौशिकन नावाच्या अभ्यासकाने बँकॉक येथे आयोजित परिषदेत या Asia Different Standards लेखातून असे स्पष्ट केले आहे की, आशियाई राष्ट्रांच्या दृष्टीने मानवाधिकाराची मांडणी केली गेली पाहिजे. मलेशियाचे माजी पंतप्रधान डॉ. महातीर मोहमंद यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जागतिक घोषणापत्राची पुनमांडणी करणे नितांत गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्राने व्हिएन्ना परिषेदेत १९९३ मध्ये मानवाधिकारांच्या वैश्विकतेचा पुनरुच्चार केला व वेगवेगळया राष्ट्रांच्या सांस्कृतिक, प्रादेशिक, धार्मिक विशिष्टतेला विरोध केला.

**वैश्विक मानवाधिकार घोषणापत्रातील तरतूदी :**

वैश्विक मानवाधिकार घोषणापत्रामध्ये मुख्य ३० कलमे समाविष्ट आहेत :

**अ) व्यक्तीचे कायेदशीर अधिकार :**

घोषणेतील कलम १ ते १२ मध्ये खालीलप्रमाणे व्यक्तीस कायदेशीर अधिकार देण्यात आले आहेत.

१. सर्व व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र आहेत म्हणून या सर्वांना एकसारखीच प्रतिष्ठा व अधिकार देण्यात येईल.
२. प्रत्येक जण अधिकार व स्वांतत्र्य उपभोगण्यास पात्र आहे.
३. प्रत्येकास जिवीत, स्वांतत्र्य व सुरक्षेचा अधिकार आहे.
४. गुलामगिरीवर बंदी असावी.
५. कोणत्याही व्यक्तीचा छळ होऊ नये व त्यास अमानवी वागणूक मिळता कामा नये.
६. कायद्यासमोर सर्व जण समान आहेत.
७. प्रत्येकास मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार आहे.
८. स्त्री व पुरूषांना समान अधिकार आहेत.
९. प्रत्येकाला विचार करण्याचे, विवेकाचे व धार्मिक स्वातंत्र्य आहे.
१०. शांततामय मार्गाने एकत्र येण्याचे व संघटना स्थापन करण्याचे स्वांतत्र्य आहे.
११. कामाचा व मर्जीने रोजगार प्राप्त करण्याचा अधिकार आहे.
१२. प्रत्येकास शिक्षणाचा अधिकार आहे.

**ब) कायदेशीर अधिकार व व्यक्तीस्वातंत्र्याचे अधिकार :**

» कलम ६ ते २१ मध्ये कायदेशीर व व्यक्तिस्वातंत्र्य संदर्भातील अधिकार दिले गेले आहेत.
» कायद्यासमोर व्यक्तीची ओळख समान आहे. व्यक्तीचे अधिकार परिणामकारकरित्या बजावण्यासाठी कायदेशीर उपाययोजनेचा अधिकार आहे.
» मनमानी होणारी व्यक्तीची अटक, स्थानबध्दता अथवा चौकशी यावर बंदी.
» प्रत्येकास योग्य व सार्वजनिक प्राधिकरण व न्यायालयाकडे दाद मागण्याचा समान अधिकार आहे.

Smt. P.D. Patil Social Work College Code 225 Khadki, Akola

» अटकेतून मुक्तता करून घेण्याचा अधिकार प्रत्येकास आहे.
» प्रत्येक व्यक्तीस मोकळेपणाने शासनाच्या कारभारात सहभाग घेण्याचे अधिकार कलम १७ मध्ये मालमत्तेच्या अधिकाराची चर्चा करण्यात आली आहे.

**क) सामाजिक आर्थिक अधिकार :**

२२ ते २७ कलमांमध्ये व्यक्तीस आर्थिक व सांस्कृतिक अधिकार देणे आवश्यक आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे व्यक्तीची प्रगती होते व तिला प्रतिष्ठा प्राप्त होते. पण हा अधिकार प्राप्त करण्यासाठी व्यक्तीस राज्याने उपलब्ध करून दिलेल्या संसाधनांवर विसंबून राहावे लागते. म्हणून असे म्हटले जाते की, हे अधिकार दुबळे आहेत.

कलम २५ मध्ये व्यक्तीच्या राहणीमानाचा व कुटूंबाचा दर्जा वाढवण्याठी पुरेसे अधिकार दिले आहेत. त्या अधिकारात अन्न, वस्त्र, आरोग्य व सामाजिक सुरक्षेचा अंतर्भाव होतो. तथापि, रोजगार गमावला आहे व परिस्थितीमुळे व्यक्तीच्या वाट्यास असमर्थता आली असेल, तर ते पुनर्प्राप्त करण्याचा व्यक्तीस अधिकार आहे. अल्पसंख्याकांच्या अधिकाराची तरतूद नव्हती, पण १९९२ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी हा मुद्दा एका घोषणेने मध्यवर्ती आणला. त्यास अल्पसंख्याकांच्या अधिकाराचे घोषणापत्र (Minority Right Declaration) असे म्हणतात.

एकूणच UDHR चे स्वरूप स्पष्ट करताना असे सांगण्यात येते की UDHR अविभातिज व अंतर्गत परस्परसंबंध प्रस्थापित करणारी व्यवस्था आहे. अधिकाराच्या एकरांची गटाचे उल्लंघन करून दुसऱ्या अधिकाराचे उद्दिष्ट प्राप्त करता येत नाही. सर्व अधिकार एकमेकांवर अवलंबून असतात.

वैश्विक मानवाधिकार घोषणेचा भारतीय राज्यघटनेवरील प्रभाव व मानवाधिकारांचे संरक्षण. मानवाधिकारांच्या जपणुकीसाठी बऱ्याच देशांच्या राज्यघटनांनी वैश्विक मानवाधिकार घोषणेकडून व करारनामान्या मार्फत प्ररेणा घेतलेल्या आहेत. शिवाय अनेक देशामध्ये न्यायालयीन सक्रियता सुध्दा प्रेरित झालेली दिसते. भारतीय राज्यघटनेत मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणापत्राचे व करारनाम्याचे प्रतिबिंब बऱ्याच अंशी पडलेले दिसते. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी लिखित घटना असून नागरिकांना मुलभूत हक्कांची हमी देणारी व भविष्यात नागरिकांच्या हक्कांचे विस्तारीकरण करणारी आहे. उघडपणे राज्यघटनेच्या II व IV भागांमध्ये, ज्यात मुलभूत अधिकार व राज्याच्या नितीदर्शक तत्वांचा समावेश आहे. त्यात त्यांचा समावेश झालेला आहे.

भारतीय राज्यघटनेतील मानवाधिकाराच्या व कर्तव्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी पाच वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

पहिले वैशिष्ट्य असे की, भारतीय राज्यघटनेत फक्त व्यक्तींना अधिकार दिले आहेत असे नाही, तर अल्पसंख्याकाना कलम २९ व ३० प्रमाणे सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार दिले आहेत. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, कलम १७ प्रमाणे अस्पृश्यता नष्ट करण्याबरोबरच भेदभावात्मक वागणूक जी अस्पृश्य व हिंदू स्त्रिया यांना दिली जाते. ती नष्ट करण्याच्या हेतूने निरपेक्ष कायदे केलेले आहेत. पारंपरिक, अन्यायकारी श्रेणीरचनेवरून आधारीत समाजरचना बदलून त्या ठिकाणी समतामुलक व सामाजिक न्यायावर आधारित व्यवस्था निर्माण करण्याच्या राजकीय व्यस्थेचा उद्देश आहे. तिसरे असे की, समाजातील दुर्बल घटक ज्यामध्ये अनुसूचित जाती / अनुसुचित जमाती / इतर मागासवर्गीयांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. अशा घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी राखीव जागांचे धोरण राज्यघटनेने अंगीकारले आहे. या धारेणानुसार नोकऱ्यांत या वर्गासाठी ४९.५% राखीव जागा ठेवण्यात आल्या. २२.५ % जागा विधीमंडळात राखीव ठेवण्यात आल्या. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे १९९२ मध्ये ३३% जागा स्रियांसाठी ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थामध्ये राखीव ठेवण्यात आल्या आहेत. चौथे वैशिष्ट्य म्हणजे राज्याची नितीदर्शक तत्वे हि होत. जी मानवाधिकाराचे संवर्धन व प्रस्थापन करण्यात महत्वाची भूमिका पार पाडतात. नितीदर्शक तत्वांच्या संदर्भात न्यायालयात दाद मागण्याचा जरी अधिकार जरी नसला, तरी राज्याला विविध क्षेत्रात मार्गदर्शन प्राप्त करण्याची फार मोठी संधी या तत्वांनी निर्माण केली आहे. उदारहणार्थ, कामाचा अधिकार, शोषणाविरुध्द अधिकार, मुलांचे अधिकार, स्वातंत्र्य व प्रतिष्ठा, बेरोजगारी, वृदधत्व, आजार, मातृत्व रजा, योग्य व आरोग्यदायी जीवन इत्यादी बाबतीत अनेक सामाजीक विधेयके (social legislation) संमत केली आहेत. त्याचा लाभ मानवाधीकार प्रप्त करण्यास मदत झाली आहे. पाचवे व शेवटचे वैशिष्ट्य नागरीकांच्या कर्तव्यासंबंधीचे आहे व ते ५१ (अ) या कलमान्वये स्पष्ट केले आहे. ते ४२ व्या घटनादुरुस्ती कायदा १९७६ नुसार रमूद करण्यात आले आहेत.

या पाच वैशिष्टयांबरोबरच मानवाधिकारांच्या प्रस्थापनेत व संवर्धनात राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांचे तिसरे प्रकरण फारच महत्वाचे आहे. त्यातील कलम १४ व १८ अन्वये समतेच्या अधिकाराचा पुरस्कार करण्यात आला आहे. धर्म, जात, वंश, पंथ, लिंग अशा कोणत्याच आधारावर भेदभाव न करता व्यक्तींना समान संधी, कायद्यासमोर सर्व समान, कायद्याचे सर्वांना सारखेच संरक्षण देण्याची हमी राज्यघटनेने दिली आहे. स्वातंत्र्याचा अधिकार महत्वाचा व मूलभुत आहे. त्याची हमी राज्यघटनेने घेतली आहे. भाषणस्वातंत्र्य, श्रद्धामूल्य जोपासण्याचे स्वातंत्र्य, निवासाचे स्वातंत्र्य, देशांतग्रत भ्रमणस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य प्रत्येक नागरीकास राज्यघटनेने प्रदान केले आहे. त्याचबरोबर कलम २१ प्रमाणे व्यक्तीस जीवितास अधिकार प्राप्त झाला आहे, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची हमी मिळाली आहे. या अधिकारानुसार काणत्याही व्यक्तीस मनमानीपणे (arbitrary) अटक केली जाणार नाही, शिवाय व्यक्तींना वैधानिक मदत प्राप्त करता येईल. या संदर्भात भारतात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग कार्य करताना दिसते. भारतात अंतर्गत सुरक्षिततेसाठी Terrorist and Distractive Activities Act (TADA) d prevention of terrorist (POTA) या कायद्यामुळे नागरी स्वातंत्र्याचा संकोच होतो, असे मानवाधिकार कार्यकर्त्यांचे म्हणणे असते.

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग**

(National Human Right Commission):

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेतील कलम ५५ व ५६ प्रमाणे मानवाधिकाराची अंमलबजावणी करणे हे आंतराष्ट्रीय संक्रियेतेचा विषय आहे. त्यानुसार भारतात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. मानवाधिकारासंबंधीचे राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA. College Code 225



Scanned with OKEN Scanner

जबाबदार पार पाडण्याचे उद्दिष्ट प्राप्त करण्याचा हा प्रयत्न होय. या आयोगात एक अध्यक्ष व सात सदस्य असतात. आयोगाची रचना व्यावसायिक व बहूविध सामाजिक स्वरूपाची आहे.

आयोगाच्या सदस्याच्या नेमणूका, कार्यकाल कलम ३ प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे. कायद्यानुसार आयोग स्वायत्त आहे. अध्यक्षाची व सात सदस्यांची नेमणूक भारताचा राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभेचा सभापती, गृहमंत्री, लोकसभेतील व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेता, राज्यसभेचा उपाध्यक्ष मिळून प्रस्थापित झालेल्या समितीच्या शिफारसीनुसार करीत असतो. त्याचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो किंवा वयाच्या ७० व्या वर्षापर्यंत हि जबाबदारी त्यांना देण्यात येते. त्यांची पुनर्नियुक्ती केली जात नाही. त्यांना त्यांच्या पदावरून बडतर्फ करता येत नाही व जर करायचे असेल तर कायद्यात नमुद केलेल्या अवघड पध्दतीचा अवलंब करावा लागतो. यावरून एक स्पष्ट होते की, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास स्वायत्तपणे कार्य करण्याची पुर्ण संधी व स्वायत्ता देण्यात आली आहे. हे आयोग दैनंदिन राजकारण्यांच्या प्रभावाखाली कार्य करीत नाही. या आयोगास उचित अधिकार देण्यात आले असल्याने मानवाधिकार क्षेत्रात भयमुक्त व अमिषयुक्तपणे कार्य करण्याची कायदेशीर तरतुद आहे. पीपल्स मुव्हमेंट फॉर ह्युमन राईटस्, आंधप्रदेशात, पश्चिम बंगालमध्ये सिव्हील लिबटी कमिटी (CLC) कार्यरत आहेत व अधिकाराच्या उल्लंघनाविरोधात १९८० पासून कार्य करत आहेत.

**संदर्भ सुची**


१. वाघमारे बी. एस. मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, पिअरसन प्रकाशन, दिल्ली, २०१२
२. प्रा. पाटील व्ही.वी. मानवी हक्क, के. सागर प्रकाशन, पुणे २००९
३. मिसाळ चंद्रकांत, मानवी हक्क व जबाबदाऱ्या, व्हिजन प्रकाशन पुणे, २०१५
४. समग्र मानवी हक्क, के. सागर प्रकाशन, पुणे २०१३
५. Nanjeshwar P.K., Human Rights movement chamdratara L.K. Publication Kanpur (U.P.) 2012
६. Human Rights in International Relations, Combridge Press 2012


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

■■■

Scanned with OKEN Scanner





DR. B. L. BHOLE VICHAR MANCH, NAGPUR

*Organizes*

ONE DAY MULTIDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

*In Collaboration with*

Yeshwant Rural Education Society's

YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO, DIST. WARDHA

DEPARTMENT OF SOCIOLOGY & POLITICAL SCIENCE ON

# INDIAN CONSTITUTION & HUMAN RIGHTS (VALUES & RELEVANCE)

# Certificate

*This is to certify that*

*Prof./Dr.* प्रेमसिंग प्रल्हाद जाधव

*of* श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,खडकी जि. अकोला.

*has published & also presented a paper entitled*

भारतीय संविधान आणि मानवी हक्क -चळवळ

*in National Conference & also published in* ***Conference Proceedings*** *on "Indian Constitution & Human Rights" (Values & Relevance) published on dated 20th Sept. 2025. This Certificate is issued in recognition of publication / participation in National Conference.*

***Prof. Archana D. Barange***
Head, Department of Sociology
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

***Dr. Sandip B. Kale***
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Principal,
Smt. Panchfuladevi Patil College of Social Work, Khadki, Akola (M.S.)

Scanned with OKEN Scanner